MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष सतरावे / अंक ७ / जुलै २०१६

## संपादकीय

### उषःकाल होता होता...

'चातक' आणि 'शेतकऱ्यांन' इतकीच पावसाची वाट सामान्य मनुष्यही आतुरतेने बघत असतो. पहिल्या पावसानंतर येणारा मातीचा सुगंध, आणि धुतली गेलेली झाडे आणि घरे बघून मन प्रसन्न होत नाही असा माणूस सापडणार नाही. लेखक आणि कवींची प्रतिभाही या पावसामुळे फुलू लागते. बालकवी लिहितात –

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे। क्षणांत येते सरसर शिरवे, क्षणांत फिरुनि उन पडे।।
वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे। मंगल तोरण काय बांधिले, नभोमंडपी कुणी भासे।।

पी. सावळाराम म्हणतात,

'रिमझिम पाऊस पडे सारखा, यमुनेलाही पूर चढे, पाणीच पाणी चहुकडे ग बाई, गेला मोहन कुणीकडे ।।धृ।।
तरुवर भिजली भिजल्या वेली, ओली चिंब राधा झाली, चमकुन लवता, धरती भिजली,
दचकून माझा ऊर उडे ग बाई, गेला मोहन कुणीकडे ।।१।।

तर आरती प्रभू लिहितात –

ये रे घना, ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना ।।धृ।।
फुले माझी अळुमाळु, वारा बघे चुरगूळू
नको नको म्हणताना, गंध गेला रानावना ।।१।।

गेली कित्येक दशकं मराठी माणूस सगळ्या ऋतुंमध्ये पावसाच्या या गीतांचा आस्वाद घेत आला.

आता मात्र काळ बदलला आहे.

मधुर भावगीतांची जागा आता 'बेंजो' आणि 'कर्कश' ढोलताश्यांनी घेतली आहे 'धबधब्यांना बंदीचे कुंपण' या शिर्षकाखाली, मंगळवार, दिनांक १९ जुलै २०१६ च्या 'महाराष्ट्र टाइम्स' मधील बातमी बोलकी आहे.

''पावसाळ्यांतील पर्यटनाच्या बहुतांश ठिकाणांवर निसर्गाचा आनंद लुटण्याऐवजी दारु पार्ट्याच रंगताना दिसतात. तरुणांची टोळकी अक्षरशः धिंगाणा घालत असल्याने कुटुंबासह या पर्यटनस्थळी जायची फारशी कुणाची हिंमतही होत नाही एवढी परिस्थिती खालावली आहे...''

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

गुहागरपासून जुहूपर्यंतच्या चौपाट्यांवर 'धोक्याच्या' पाट्या लिहूनही अनेक मुलमुली दरवर्षी दगावतात. बेजबाबदार 'धिंगाणा' आणि 'साहस' यामधला फरक हा फक्त 'अभिरुची'चा असतो. जी गोष्ट धबधब्यांची आणि चौपाटीची, तीच गोष्ट गडकिल्ल्यांची. २० जुलै २०१६ च्या बुधवारच्या 'सकाळ' वृत्तपत्रामधील कोकण रेल्वेची बातमी म्हणते,

''... गोव्याहून पर्यटन करून परतणाऱ्या मद्यपी प्रवाशांच्या उद्धट वागणुकीचा त्रास इतर प्रवाशांना सहन करावा लागतो...''

नवश्रीमंतीमुळे सध्या 'दोनचाकी' आणि 'चारचाकी' वाहनांमध्ये ही बेसुमार वाढ झाली आहे. 'सरस्वती'ला बाहेर हुसकावूनच 'लक्ष्मी' बहुतेक घरांत प्रवेश करते. मुक्त महामार्ग काय किंवा शहरातील रस्ते काय, 'सुसाट' आणि 'आचरट' वेगामुळे होणारे अपघात, आणि निरापराधांचा जाणारा बळी यांच्या बातम्या जमवायच्या म्हंटल्या तर एका नव्या ग्रंथालयाचीच निर्मिती करायला लागेल. अशा अपघातांना किंवा धिंगाण्याला जबाबदार व्यक्ती या कुणी गरीब 'बिचाऱ्या' किंवा 'अशिक्षित' नसतात.

समाजाचे हे चित्र कुठली 'प्रगती' दाखवते?

'समाज' आणि 'मानव' वंशशास्त्रज्ञांचा एक आवडता 'छंद' आहे. 'अट्टल गुन्हेगार', 'बलात्कारी', 'खुनी' यांच्या 'मनोसामाजिक' पार्श्वभूमीचा अभ्यास करणे. या छंदाचे निष्कर्षही ठरलेलेच असतात. 'गरीबी', 'बेरोजगारी' आणि याला आणखीन खमंग फोडणी हवी असेल तर 'जातीयवाद' यांच्या माथी या सगळ्या कुकर्माचे खापर फोडण्यांत येते. वास्तविक या असल्या 'खुळचट', 'आचरट' आणि 'ठोकळेबाज' सामाजिक विश्लेषणामुळेच अनेक वर्ष या मूळ विकृतीला सातत्याने 'खतपाणी' घातले गेले.

Justice delayed is Justice denied असं म्हणतात. 'प्रामाणिक' आणि 'नेमस्त'पणे वागणाऱ्या नागरीकापेक्षा धटींगण गुन्हेगारीला आपल्या घटनेनी अधिक संरक्षण दिले आहे, असे आजचे लाखोंनी न्यायालयातील प्रलंबित खटले बघून वाटले तर त्यात गैर काहीच नाही. इथेच ही कथा थांबत नाही. तर हे 'धटींगण' आणि 'गुन्हेगार' विनाप्रयास राजकीय क्षेत्राकरता 'पात्र' उमेदवार ठरतात. बुधवार, २० जुलै २०१६ च्या 'लोकसत्ते'चे 'सडके पौरुष' या संपादकीयानी या गोष्टीवर नेमके बोट ठेवले आहे.

''हे असे आपल्याकडे वारंवार होते याचे कारण आपल्यासारख्या व्यवस्थाशून्य समाजात कायदा मोडणे हे पुरुषार्थाचे लक्षण मानले जाते. मग तो गावातला टिनपाट पुढारी असो, राष्ट्रीय नेता असो की उद्योगपती. जेवढा मोठा कायदेभंग तेवढी मोठेपणाची प्रभावळ मोठी. खंत ही की अशा व्यवस्थाशून्य समाजात या कायदेतोड्यांना समाजही नायकत्व देतो. परिणामी नियमाने चालणारे हे नामर्द ठरू लागतात आणि मिळेल ते ओरबाडून घेणे हे न्याय मानले जाते... गर्हणीय गुन्हा करणारे जेवढे त्यास जबाबदार आहेत तेवढाच अशा गुन्हेगारांना जोपासणारा समाजही जबाबदार आहे...''

आपल्याला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली. सत्ता बदल झाले. पण 'सत्ता' मिळवण्याकरता लागणाऱ्या 'व्याकरणा'मध्ये मात्र काडीचाही बदल झालेला नाही. सत्ताधारी विरोधक झाल्यावर, किंवा विरोधक सत्ताधारी झाल्यावर, आपली 'गुन्हेगारी' किंवा 'भ्रष्टाचारा'वर घोषित धोरणं, किंवा भूमिकांच्या बाबतीत सर्वच राजकीय पक्षांनी घेतलेल्या कोलांट्या उड्या बघून मेंदूला मुंग्या आल्याशिवाय राहात नाहीत. दुर्दैवाने राजकारणातील गुन्हेगारीला पायबंद बसेल असे आपल्या घटनेमध्ये काहीच नाही. २००५ मध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना मंत्रिमंडळात सामाऊन घेऊ नये म्हणून दाखल केलेल्या जनहित याचिके (PIL) वरती उच्चतम न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने आपल्या १२३ पानांच्या

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सतरावे/अंक ७/जुलै २०१६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | उत्क्रांतीवादाच्या जनकाचे निवासस्थान | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | शास्त्रवेध-४: गुरूत्वाकर्षण | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : २९) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ५) | ओळख वनस्पतींची-जायफळ | श्री. प्रकाश दुधाळकर | १४ |
| ६) | माझी लंडन वारी | अमिता योगेश खांडेकर | १५ |
| ७) | परित्राणाय साधूनां | प्रा. महेश मनोहर भानुशाली | १७ |
| ८) | विद्यार्थ्यांशी संवाद | प्रा. ह. श्री. परांजपे | १९ |
| ९) | युरोपच्या संघातून युनायटेड किंगडमची नाट्यमय 'एक्झीट'-'ब्रेक्झीट' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २४ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# उत्क्रांतीवादाच्या जनकाचे निवासस्थान

*चार्ल्स डार्विन जेथे राहात असत ते डॉऊने गावातील घर 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून सुरक्षित ठेवण्यात आले आहे. त्या घराला भेट देऊन आल्यावर लिहिलेला हा लेख आहे – संपादक*

विज्ञानाच्या प्रगतीत चार्ल्स डार्विन यांचे स्थान वेगळेच आहे. ईश्वराने ही सृष्टी निर्माण केली असून या सृष्टीतील विविध सजीव त्यांनीच निर्माण केले असा ख्रिस्ती धर्मियांचा विश्वास होता. या मताला तडा जाईल असा एक सिद्धांत चार्ल्स डार्विन यानी मांडला. त्या सिद्धांताला 'उत्क्रांतीवादाचा सिद्धांत' असे म्हणतात. एकपेशीय प्राण्यांपासून क्रमाक्रमाने वेगवेगळे सजीव निर्माण झाले असे आपले मत त्यांनी मांडले. या सिद्धांताचे दोन भाग होते. त्यातील एक म्हणजे योग्य प्राण्यांचे जगणे आणि दुसरे म्हणजे अनुकूलन. त्याच्या या मताला धर्ममार्तंडांकडून अर्थातच विरोध झाला. त्या विरोधाला त्यानी पुराव्यासकट उत्तरे दिली. आज डार्विनचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत सर्वमान्य झाला असून शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश देखील करण्यात आलेला आहे. उत्क्रांतीवादाच्या जनकाचा जन्म १८०९ मध्ये झाला. १८८२ मध्ये म्हणजे वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी इहलोकाची यात्रा संपविली. जीवनाचा ४० वर्षांचा मोठा कालावधी त्यांनी इंग्लंडमधील डॉऊने या खेड्यात व्यतीत केला. हे घर राष्ट्रीय स्मारक म्हणून सुरक्षित ठेवण्यात आलेले आहे. इंग्लंड मध्ये इंग्लिश हेरिटेज नावाची एक संघटना आहे. ही संस्था देशातील महत्त्वाच्या ठिकाणांची देखभाल करते. चार्ल्स डार्विनच्या 'डाउन हाऊसची' जबाबदारी देखील याच संस्थेकडे आहे. १९९६ मध्ये या संस्थेने ते त्यावेळेच्या मालकाकडून विकत घेतले. त्यात योग्य ते बदल करून त्या घराला स्मारकाचे रूप दिले. विज्ञान विषयाचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तींसाठी या घराला भेट देणे म्हणजे एखाद्या मंदिराला भेट देण्यासारखे आहे. म्हणूनच इंग्लंड सहलीत सहभागी झालेल्या सभासदांना आम्ही हे स्मारक दाखविण्यासाठी घेऊन गेलो. या भेटीवर आधारित हा लेख आहे.




**ब्रोम्ले साऊथ रेल्वे स्थानक**

डाऊने हे गाव आमच्या राहाण्याच्या ठिकाणापासून जरा दूरच होते. तेथे कसे जायचे याची आम्ही माहिति काढली तेव्हा कळले की तिथे जाण्यासाठी प्रथम ब्रोम्ले साऊथ या रेल्वे स्थानकावर जावे लागते. त्यानुसार आमच्या राहाण्याच्या ठिकाणापासून भुयारी रेल्वेने आम्ही व्हिक्टोरिया स्टेशनवर पोहोचलो. तेथून आम्हाला जमिनीवरून आपिंगटन कडे जाणाऱ्या गाडीने जायचे होते. वेगवेगळ्या ठिकाणी लावलेले माहितीचे फलक बघत बघत आम्ही योग्य फलाटावर पोहोचलो. तिथे गाडी लागलेलीच होती. रिकामा डबा शोधून आम्ही गाडीत बसलो. साधारणपणे चाळीस मिनिटांच्या प्रवासानंतर आमची गाडी ब्रोम्ले साऊथ या स्थानकावर पोहोचली. स्थानकाच्या बाहेर येऊन आम्ही १४६ क्रमांकाच्या बसची वाट पाहू लागलो. हा खेड्याचा परिसर असल्याने बसची संख्या कमी आहे. आम्हाला हवी असलेली बस दर तासानी आहे. याची आम्हाला आधीच माहिती असल्याने त्यानुसार आम्ही गाडी पकडली होती. त्यामुळे आम्हाला फार वेळ थांबावे

लागले नाही. थोड्याच वेळात बस आली. अर्ध्या तासाच्या प्रवासानंतर ती डाऊने गावात पोहोचली. डाऊने चर्च जवळ असलेल्या बस थांब्यावर आम्ही उतरलो.



डाऊने गाव

युरोप खंडातील कोणत्याही खेड्यासारखे ते एक खेडे होते. अरूंद परंतु गुळगुळीत डांबरी रस्ते. त्याच्या दोन्ही बाजूला टुमदार कौलारू घरे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे आणि प्रत्येक घरात एक छोटीशी बाग. सर्वत्र स्वच्छता आणि स्मशान शांतता. वाट विचारावी तर रस्त्यावर एकही माणूस नाही. आमच्या बसमधून आलेले दोन-तीन प्रवासी तेथे उतरले आणि आपापल्या वाटेने निघून गेले. त्याने आमचे काहीही अडले नाही. डाऊन हाऊस असा फलक आमच्या नजरेस पडला. त्यावर दाखविलेल्या बाणाच्या दिशेने आम्ही चालू लागलो. कोकणातल्या एखाद्या गावातून आम्ही मार्गक्रमण करीत आहोत असेच आम्हाला वाटले. गप्पा मारत आम्ही दहाएक मिनिटे चाललो असेल तेव्हढ्यात आम्हाला डाऊन हाऊसची मोठी पाटी दिसली. प्रवेशद्वाराजवळ अनेक वाहने उभी होती. तिथून नजर टाकली की एक टुमदार तीनमजली बंगला आणि त्याच्या भोवती एक प्रचंड मोठी बाग असे या डाऊन हाऊसचे स्वरूप दिसते. झपाझप पावले टाकत आम्ही बंगल्याजवळ पोहोचलो.

या घराची कहाणी फारच मनोरंजक आहे. सतराव्या शतकात हे घर फार्म हाऊस म्हणून प्रथम बांधले गेले. या घराची मालकी एकीकडून दुसऱ्याकडे जात राहिली. १८१९ मध्ये तर या घराची मालकी इस्ट इंडिया कंपनीत कामाला असलेल्या कर्नल जॉन जॉन्सन यांच्याकडे होती.




स्मारकाची पाटी

१८३७ मध्ये ते रेव्हरंड जेम्स ड्रमंड यांच्याकडे हे घर सुपूर्द करून दुसरीकडे राहायला गेले. त्यांनी घरात बऱ्याच सुधारणा केल्या. परंतु तीनच वर्षांत त्यांनी ते घर विक्रीला काढले. त्या वेळी चार्ल्स डार्विन लंडनमध्ये राहात असत. चार्ल्स, त्यांची पत्नी एमा आणि त्यांची दोन मुले असा त्यांचा परिवार होता. या परिवाराला लंडन मधील जागा अपुरी पडत होती. त्याहीपेक्षा लंडन मधील गजबजाटाला आणि प्रदूषणाला डार्विन कंटाळले होते. बिगल जहाजावरील सफर संपवून ते परत आले होते. या प्रवासात त्यांनी अनेक नमुने गोळा केले होते. ते ठेवण्यासाठी त्यांना प्रशस्त अशी जागा हवी होती. प्रवासात केलेल्या निरीक्षणावरून एका नव्या सिद्धांताने त्यांच्या मनात जन्म घेतला होता. त्याला मूर्त रूप देण्यासाठी काही प्रयोग करण्याची गरज होती. या सगळ्या गोष्टींसाठी त्यांना शहरापासून दूर शांत अशा जागेची गरज होती. लंडन शहरापासून जरा दूर परंतु रेल्वे स्थानकापासून जवळ असलेले ठिकाण ते शोधत होते. त्यांच्या या शोध-कार्यात त्यांच्या वडिलांनी त्यांना मदत केली. शोधता शोधता त्यांना डाऊने गावातील विक्रीला असलेले घर सापडले. ते विकत घेऊन १८४२ च्या जुलै महिन्यात ते या घरात राहायला आले. तेव्हापासून त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १८८२ पर्यंत ते याघरातच राहिले. या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत या घराने अनेक चढ-उतार पाहिले. याच घरात त्यांच्या आणखी आठ पुत्रांचा जन्म झाला.

चार्ल्स डार्विनच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसदारांनी हे घर भाड्याने दिले. १९०६ पर्यंत अनेक भाडेकरू या घरात



डाऊन हाऊस

राहून गेले. १९०७ मध्ये या इमारतीत मुलींसाठी निवासी शाळा सुरू करण्यात आली. जागा अपुरी पडू लागल्याने १९२४ मध्ये ही शाळा दुसरीकडे स्थलांतरित करण्यात आली. त्यानंतर या घरात दुसरी मुलींची शाळा सुरू झाली. परंतु तीनच वर्षांत ती बंद पडली. इंग्लंडमध्ये ब्रिटिश असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स नावाची विज्ञानाच्या प्रगतीला वाहिलेली संघटना आहे. या संघटनेच्या १९२७ च्या वार्षिक सभेत असे ठरले की हे घर या असोसिएशनने घ्यावे. या निर्णयाची अमलबजावणी करण्यासाठी सर जॉर्ज बक्सटन ब्राऊन या शल्यचिकित्सकाने हे घर विकत घेतले. त्याची डागडुजी केली आणि असोसिएशनकडे ७ जून १९२९ रोजी सुपूर्द केले. त्यानंतर सहा महिन्यांनी ही इमारत संग्रहालयाच्या रूपात लोकांना खुली करण्यात आली. डाऊन हाऊसचे आजचे जे स्वरूप आहे ते त्याला 'इंग्लिश हेरिटेज' मुळे मिळाले. इंग्लिश हेरिटेज ही संस्था राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाच्या जुन्या इमारतीची डागडुजी आणि देखभाल करण्याचे काम करते. या संघटनेने वेलकॉम ट्रस्टकडून मिळालेल्या देणगीतून १९९६ साली हे घर विकत घेतले. त्यानंतर दोन वर्षे त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात गेली. एप्रिल १९९८ मध्ये हे स्मारक नव्या रूपात उघडण्यात आले. २००९ मध्ये डार्विनची द्वितीय जन्म शताब्दी साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने या स्मारकात अनेक सुधारणा करण्यात आल्या. डार्विनची जीवन कहाणी सांगणारे नवीन प्रदर्शन निर्माण करण्यात आले. डेव्हिड ॲटनबरो या चित्रपट निर्मात्याने त्याचे कार्य दाखविणारी चित्रफीत निर्माण केली. ती देखील या स्मारकात उपलब्ध करून देण्यात आली आहे.



घरामागे असलेले एक जुने झाड

डाऊन हाऊस पाहाण्यासाठी शुल्क भरावे लागते. प्रवेशाची पावती घेऊन आम्ही सर्वांनी घरात प्रवेश केला. प्रत्येकाला एक ध्वनीफीत देण्यात आली होती. ज्या ठिकाणी आपण उभे आहोत तेथला क्रमांक दाबायचा म्हणजे ध्वनीमुद्रित माहिती आपल्याला ऐकायला मिळते. काही ठिकाणी चित्रफितीच्या मदतीने माहिती दिलेली आहे. दूरचित्रवाणी संचावर आपण बोट ठेवण्याचा अवकाश की पडद्यावर माहिती प्रगट होते. ध्वनीफीत, चित्रफीत, छापील मजकूर आणि प्रदर्शित वस्तूंच्या मदतीने चार्ल्स डार्विनचे जीवन आणि कार्य यांची इत्थंभूत माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. वरच्या मजल्यावर डार्विनची अभ्यास खोली जशीच्या तशी ठेवण्यात आली आहे. येथे त्याने प्रवासात लिहिलेल्या नोंदी आहेत. त्याचबरोबर 'ओरिजिन ऑफ स्पेसिस' या पुस्तकाची हस्तलिखिते आहेस. त्यांनी बिगल जहाजावर प्रवास करताना गोळा केलेल्या काही वस्तू एका खोलीत ठेवलेल्या आहेत. बिगल जहाजाचा प्रवास दाखविणारा एक मोठ नकाशा तेथे लावून ठेवलेला आहे. एवढी महत्त्वाची माहिती सहज उपलब्ध झाल्याने डार्विनचा उत्क्रांतीवाद समजायला मदत होते. शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकदातरी या स्थळाला भेट द्यावी. प्रदर्शन एकंदर तीन मजल्यांवर पसरलेले आहे. अनेक खोल्या, अनेक वस्तू हे सगळे पाहायला

एखादी चांगली गोष्ट मुळीच न करण्यापेक्षा ती कमी प्रमाणात करणे किंवा सावकाशीने करणे श्रेयस्कर.

बराच वेळ लागतो. त्यात संपूर्ण दिवस जातो. आम्हाला मात्र ही भेट अर्ध्या दिवसात संपवायची होती. त्यामुळे इमारतीच्या आत असलेले प्रदर्शन पाहून आम्ही बाहेरचे प्रदर्शन पाहायला बाहेर पडलो.



**घराबाहेर असलेली सुंदर बाग**

घराच्या बाहेर मोठी बाग आहे. तेथे अनेक प्रकारच्या वनस्पती आहेत. जवळच एक हरितगृह आहे. थंडीच्या दिवसात वनस्पतींची वाढ करण्यासाठी अशा हरितगृहाचा वापर करतात. चार्ल्स डार्विनने असेच एक हरितगृह उभारले होते. वनस्पतींपेक्षा वनस्पतींच्या आजूबाजूला वाढणाऱ्या सूक्ष्म प्राण्यांमध्ये त्यांना जास्त रस होता. या हरितगृहाच्या जवळच डबक्यामध्ये काही जलचर प्राणी होते. बाग एवढी मोठी आहे की त्याची एक चक्कर मारायला एका तासापेक्षा जास्त वेळ लागतो. या बागेतून फिरता फिरता चार्ल्स डार्विन आपल्या सिद्धांताबद्दल विचार करीत असत. तोच अनुभव आम्ही घेतला. फक्त आमच्या मनातील विचार मात्र वेगळे होते! परत जायला किती वेळ लागेल? बसची वेळ काय आहे, तिथे पोहोचायला किती वेळ लागेल? त्यासाठी कधी निघावे लागेल? असे अनेक प्रश्न आमच्या मनात होते. त्या दिवशी दुपारी आणखी एका ठिकाणी जायचे ठरले होते. तेथे उशीर होऊ नये यासाठी आम्ही डाऊन हाऊस मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्या वेळेस एक महत्त्वाचे ठिकाण पाहिल्याचे समाधान आमच्या चेहऱ्यावर होते.

परतीच्या प्रवासात या स्मारकाबद्दल आमची आपापसात चर्चा सुरू झाली. चार्ल्स डार्विनच्या कामाचे कौतुक तर आम्हाला आधीच होते. हे स्मारक पाहिल्यानंतर



**बागेतील ग्रीनहाऊस**



**ग्रीनहाऊसमधील वनस्पती**

इंग्लिश हेरिटेज या संघटनेच्या कामाचे आम्हाला अधिक कौतुक वाटले. या संघटनेच्या कामाला सतत आर्थिक सहाय्य लाभावे यासाठी ब्रिटिश सरकारने एक नामी शक्कल लढवली आहे. नॅशनल लॉटरीतून होणाऱ्या उत्पन्नातील एक ठरावीक रक्कम जुन्या इमारतींची डागडुजी आणि देखभाल यासाठी राखून ठेवली जाते. याला 'नॅशनल लॉटरी फंड' असे म्हणतात. या फंडातून या स्मारकाला नियमित मदत मिळते. याखेरीज, येणाऱ्या पर्यटकांकडून प्रवेश फी घेतल्याने स्मारकाच्या उत्पन्नात भर पडते. त्यामुळे पुरेशी माणसे कामाला ठेवता येतात. त्याचबरोबर, प्रदर्शनीय वस्तूंमध्ये नेहमी भर टाकता येते. जुन्या वास्तू सांभाळून ठेवण्याची इंग्रज लोकांची वृत्ती खरोखरच वाखाणण्यासारखी आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

•••

प्रलयाच्या वेळच्या झंझावाताने पर्वतसुद्धा डळमळतात हे कबुल, परंतु धैर्यवन्ताचे निश्चल मन संकटात मुळीच डगमगत नाही.

# शास्त्रवेध-४: गुरूत्वाकर्षण

*गुरुत्वाकर्षणाची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

वर फेकलेल्या किंवा आधार नसलेल्या वस्तू नेहमी खाली जमिनीवरच पडतात. हा आदिमानवापासून आजतागायत अनुभवास येत असलेला आविष्कार आहे. कारण, अशा वस्तूंना पृथ्वी आकर्षित करीत असते. किंबहुना विश्वातील प्रत्येक वस्तुकण दुसऱ्या वस्तुकणाला आकर्षित करत असतो. हा विचार १६८७ सालच्या सुमारास गणिती भाषेत न्यूटन यांनीच प्रथमतः मांडला. गुरुत्व म्हणजे मोठेपणा. परस्परांच्या कमीअधिक महानतेमुळे, दोन वस्तूंत निर्माण होणारे आकर्षण म्हणजेच गुरुत्त्वाकर्षण. ते, त्यांच्या वस्तुमानाच्या गुणाकाराच्या समप्रमाणात व त्यांच्या दरम्यान असलेल्या अंतराच्या वर्गाच्या व्यस्तप्रमाणात असते. उदा. $म_१$ व $म_२$ वस्तुमान असलेल्या व एकमेकांपासून र अंतरावर असलेल्या दोन बिंदुमात्र पदार्थांतील हे गुरुत्त्वाकर्षण बल, न्यूटन यांच्या पुढील समीकरणाने व्यक्त करता येते.

गुरुत्वबल = जी X $म_१$ X $म_२$/($र^२$). ह्या ठिकाणी जी (G) हा वैश्विक गुरुत्त्वाकर्षण स्थिरांक आहे. या समीकरणाला व्यस्तवर्ग-नियमही म्हणतात.

ह्यात, जी = गुरुत्वीय स्थिरांकाचे मूल्य = ६६८ X $१०^{-११}$ न्यूटन X वर्ग मीटर / वर्ग किलोग्रॅम, इतके असते. हे परिमाण उणा घातपट्टीवर अकराव्या पल्ल्यात आहे. म्हणून हे उघडच आहे की गुरुत्त्वबल हे आपण अनुभवत असलेल्या इतर व्यावहारिक बलांपेक्षा अत्यंत क्षीण असते. काही अंतरावर उभ्या असलेल्या दोन व्यक्तींमधील परस्पराकर्षणाचे गुरुत्त्वबल, एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस ढकलून देतांना वापरलेल्या बलाच्या तुलनेत नगण्य ठरते. मात्र जेव्हा वस्तुमाने अवाढव्य होऊ लागतात, तेव्हा गुरुत्त्वबलेही अवाढव्य होतात. इतर व्यावहारिक बलांच्या तुलनेत ती प्रचंड ठरू पाहतात.

ज्या परिमाणाच्या पटींत आपण एखाद्या वस्तुमानाचे, मितीचे अथवा कालाचे मापन करत असतो त्याला 'एकक' म्हणतात. आज जगभर मान्यता पावलेल्या 'मेट्रिक' मापन प्रणालीत; वस्तुमान मापनाचे एकक 'किलोग्रॅम' हे आहे; मिती मापनाचे एकक 'मीटर' हे आहे आणि काल मापनाचे एकक 'सेकंद' हे आहे. वस्तुमानाद्वारे पदार्थ मोजले जातात. मितीद्वारे त्या पदार्थांची लांबी-रुंदी-अंतर, क्षेत्रफळ व आकारमान इत्यादी परिमाणे मोजली जातात. कालमापनाद्वारे आपल्याला वेळाचे संदर्भ मोजता येतात. उदाहरणार्थः एखाद्या माणसाचे वजन ६० किलोग्रॅम असू शकते, एखाद्या उद्यानाची लांबी १०० मीटर भरू शकते, तर एखाद्या कालावधीचे माप ३० सेकंदांचे राहू शकते.

इथे, वजन आणि वस्तुमान ह्यांचे अर्थ आणि त्यांच्यातील फरकही समजून घेणे गरजेचे आहे. एखाद्या वस्तूचे वजन, म्हणजे ती वस्तू गुरुत्त्वाकर्षणाचे प्रभावाने पृथ्वीप्रती ज्या 'बला'ने खेचली जात असते ते बल. हे 'बल', आपल्याला त्या वस्तूच्या वस्तुमानास, गुरुत्त्वीय त्त्वरणाने (म्हणजे मेट्रिक मापन प्रणालीत ९.८ मीटर / वर्ग सेकंद ह्या राशीने) गुणून मिळवता येत असते. बलाचे एकक असते 'न्यूटन'. निव्वळ आकड्याचीच तुलना करायची तर, वजन हे वस्तुमानाच्या सुमारे १० पट भरते. दोघांची एकके मात्र अनुक्रमे 'न्यूटन (म्हणजे किलोग्रॅम X मीटर / वर्ग सेकंद)' आणि 'किलोग्रॅम' अशी असतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर उभ्या असलेल्या

एका माणसाचे वजन ''५० किलोग्रॅम'' आहे असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा वस्तुतः त्याचे वजन ५० किलोग्रॅम वस्तुमानाच्या पदार्थाच्या वजनाइतके म्हणजे ५० X ९.८=४९० न्यूटन इतके असते. ह्याचाच अर्थ असा की, वजनाच्या उल्लेखात आपण केवळ त्याच्या वस्तुमानाचाच उल्लेख करत असतो.

आता आपण असे पाहू या की, म$_{१}$ आणि म$_{२}$ ह्या वस्तुमानांची दोन माणसे आहेत. एकमेकांपासून ती १० मीटर अंतरावर उभी आहेत. तर, त्यांच्यात परस्परांतील गुरुत्त्वाकर्षण अस्तित्वात असेल का? असल्यास ते किती असू शकेल? त्याचे परिमाण पृथ्वीच्या गुरुत्त्वाकर्षणाच्या (गुरुत्त्व बलाच्या) प्रमाणात किती भरेल?

पृथ्वीच्या पृष्ठभागावर उभ्या असलेल्या एका ५० किलोग्रॅम वजनाच्या माणसावरील पृथ्वीचे गुरुत्त्वबल = (६६८ X १०–११ न्यूटन X वर्ग मीटर / वर्ग किलोग्रॅम) X (५९७ X १०२४ किलोग्रॅम) X (५० किलोग्रॅम) / (६३,७१,००० मीटर) X (६३,७१,००० मीटर) = ६६८ X ५९७ X ५० X १० / ६.३ X ६.३ = ५०२.४ न्यूटन असते.

त्याचप्रमाणे, पृथ्वीच्या पृष्ठभागावर उभ्या असलेल्या एका २५ किलोग्रॅम वजनाच्या माणसावरील पृथ्वीचे गुरुत्त्वबल = (६६८ X १०–११ न्यूटन X वर्ग मीटर / वर्ग किलोग्रॅम) X (५९७ X १०२४ किलोग्रॅम) X (२५ किलोग्रॅम) / (६३,७१,००० मीटर) X (६३,७१,००० मीटर) = ६६८ X ५९७ X २५ X १० / ६.३ X ६.३ = २५१.२ न्यूटन असते.

मात्र, त्याच दोन माणसांतील गुरुत्त्वबल = (६६८ X १०–११ न्यूटन X वर्ग मीटर / वर्ग किलोग्रॅम) X (५० किलोग्रॅम) X (२५ किलोग्रॅम) / (६३,७१,००० मीटर) X (६३,७१,००० मीटर) = ६६८ X ५० X २५ X १० / ६.३ X ६.३ = ४.३ X १०–२१ न्यूटन भरते. हे परिमाण उणा घातपट्टीवर एकविसाव्या पल्ल्यात आहे. म्हणून हे उघडच आहे की हे गुरुत्त्वबल, हे आपण अनुभवत असलेल्या इतर व्यावहारिक बलांपेक्षा अत्यंत क्षीण असते. त्यांच्या तुलनेत ते नगण्य ठरते.

अशाच रीतीने आपण १ किलोग्रॅम वजनाच्या वस्तुवरील पृथ्वीचे गुरुत्त्वबल पाहू या. ते गुरुत्त्वबल = (६६८ X १०–११ न्यूटन द वर्ग मीटर / वर्ग किलोग्रॅम) X (५९७ X १०२४ किलोग्रॅम) X (१ किलोग्रॅम) / (६३,७१,००० मीटर) X (६३,७१,००० मीटर) = ६६८ X ५९७ द २५ X १० / ६.३ X ६.३ = १०.० न्यूटन असते असे लक्षात येईल. नेमके आकडे वापरून, आणि नेमकी अचूक आकडेमोड केल्यास, हे वजन ९.८ न्यूटन भरते हेही स्पष्ट होईल. ह्या आकड्याचे एक शास्त्रीय नाव आहे. त्याला म्हणतात 'गुरुत्त्वीय त्वरण.' मेट्रिक मापन प्रणालीत ते ९.८ मीटर / वर्ग सेकंद इतके असते.

गुरुत्त्वीय प्रवेग (त्वरण): एखाद्या वस्तूचा वेग दर सेकंदास बदलत असेल तर त्या वस्तूला प्रवेग आहे असे म्हणतात. जर एखादा दगड उंचीवरून पृथ्वीवर खाली सोडून दिला, तर तो दगड खाली पडत असताना त्याचा वेग एकसारखा वाढत असतो. गॅलिलिओ या शास्त्रज्ञाने पिसा येथील झुकत्या मनोऱ्यावर केलेल्या सुप्रसिद्ध प्रयोगाच्या साहाय्याने असे दाखवले आहे की, एकाच उंचीवरून सोडून दिलेल्या निरनिराळ्या वजनांच्या वस्तू एकाच वेळी जमिनीवर येतात. भौतिकीतील हा महत्त्वाचा प्रयोग होय. ह्या प्रयोगाच्या पूर्वी असा समज होता की, भिन्न वस्तुमानांच्या वस्तूंना एकाच उंचीवरून जमिनीवर येण्यासाठी भिन्न वेळ लागतो. गॅलिलिओ यांनी केलेल्या प्रयोगाने हा वेळ सारखाच असतो असे दाखवले. अर्थात ह्या प्रयोगात वस्तूवर इतर कोणतीही प्रेरणा (उदा. हवेचा रोध) कार्य करीत नाही असे मानलेले असते. म्हणजे गॅलिलिओ यांच्या या प्रयोगाने असे दाखवून दिले की, सर्व भिन्न वस्तुमानांच्या वस्तूंचा पृथ्वीवर पडण्याचा प्रवेग एका विशिष्ट स्थळासाठी तोच असतो. या प्रवेगास 'गुरुत्त्वीय प्रवेग' असे

म्हणतात. गुरुत्त्वीय प्रवेगाचे मूल्य पृथ्वीवरील निरनिराळ्या ठिकाणी भिन्न असते. पृथ्वीच्या दक्षिण व उत्तर ध्रुवांवर गुरुत्त्वीय प्रवेगाचे मूल्य सर्वांत जास्त असते, तर विषुववृत्तावर ते किंचित कमी असते. या प्रवेगाचे मेट्रिक पद्धतीत सरासरी मूल्य ९८ मीटर / वर्ग सेकंद असते.

गुरुत्त्वीय प्रवेगाचे एखाद्या स्थळी असलेले मूल्य सोप्या प्रयोगाने काढता येते. एखाद्या ठरावीक उंचीवरून जर दगड खाली सोडून तो किती वेळात जमिनीवर येतो तो काल जर मोजला, तर पुढील समीकरण मांडता येते: उंची = १/२ X ग X का$^{२}$.

ह्या समीकरणात का म्हणजे वस्तूला खाली येण्यासाठी लागलेला काल आणि ग म्हणजे गुरुत्त्वीय प्रवेग. उंची व लागलेला काल मोजला, तर वरील समीकरणाच्या साहाय्याने ग चे मूल्य काढता येईल. पण ग चे मूल्य तसे जास्तच असल्यामुळे एका सामान्य उंचीसाठी लागणारा काळ इतका कमी असतो की, तो बिनचूक मोजणे फार कठीण असते. म्हणून वरील प्रत्यक्ष प्रयोगाच्या साहाय्याने ग चे मूल्य काढणे कठीणच आहे. यामुळे ग चे मूल्य काढण्यासाठी इतर प्रायोगिक पद्धतींचा अवलंब करावा लागतो. या इतर प्रायोगिक पद्धतींमध्ये सर्वसाधारणतः आवर्ती (ठरावीक कालांनी पुनःपुन्हा होणाऱ्या) गतीचाच उपयोग करतात.

आवर्ती गतीचे सोपे उदाहरण म्हणजे साधा लंबक. ह्या लंबकाला लागत असलेला आवर्तकाल मोजला व लंबकाची लांबी माहीत असेल, तर ग चे मूल्य पुढील सूत्राने काढता येते: का = २π X√(ल/ग). या सूत्रात, का =आवर्तकाल, ल=लंबकाची लांबी, ग=गुरुत्त्वीय प्रवेग आणि π=(सुमारे) २२/७ .

पण या साध्या लंबकात अनेक दोष असल्यामुळे स्थूल लंबकाचा वापर करतात. केटर या शास्त्रज्ञांनी १८१७ साली व्युत्क्रमी (उलट व सुलट करता येणारा) स्थूल लंबक बनवला. त्यांनी स्वीकारलेल्या पद्धतीने लंबकाचा आवर्तकाल मोजण्यात झालेली त्रुटी अतिशय कमी म्हणजे ०.०००८ टक्केच असू शकते व अर्थातच ग चे मूल्य त्या प्रमाणात बिनचूक येते. बेसेल या शास्त्रज्ञांनी ग चे मूल्य बिनचूक काढण्यासाठी दुसरी एक पद्धत गणिताच्या आधारे दाखवली. स्थूल लंबकात असणारे दोष काढून टाकण्यासाठी त्याच्या आवर्तकालाच्या सूत्रामध्ये गणिताचा उपयोग करून बदल करण्यात आला. बेसेल यांनी केटर स्थूल लंबकाचे दोष टाळण्यासाठी निरनिराळ्या पद्धती गणिताच्या आधाराने मांडल्या, पण त्या प्रयोगात वापरण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. १८५० साली रेपसॉल्ड या शास्त्रज्ञांनी बेसेल यांच्या परिकल्पनेवर आधारलेला व्युत्क्रमी लंबक बनविला व ग चे मूल्य बिनचूक मोजले. दुसऱ्या एका पद्धतीत सर्पिलाकार (मळसूत्राकार) वंचकाच्या (स्प्रिंगच्या) टोकाला एक वस्तू बांधली व जर ती वस्तू थोडी खाली ओढून सोडून दिली, तर त्या वस्तूला वर-खाली अशी सरल हरात्मक (वस्तू स्थिर स्थितीला आणणारी प्रेरणा स्थिर स्थितीपासूनच्या अंतराच्या समप्रमाणात असते अशी) गती प्राप्त होते. त्याचा आवर्तकाल मोजला असता सूत्राच्या साहाय्याने ग चे मूल्य काढता येते.

पृथ्वीवरील गुरुत्त्वाकर्षणाच्या मानाने चंद्रावरील गुरुत्त्वाकर्षण, त्याच्या आकारानुरूप, पृथ्वीच्या सुमारे १/६ एवढे कमी असते. तिथे पोहोचलेल्या चांद्रवीरांना, साधा पाय उचलला, तर उडी मारल्यासारखी उसळी मिळाल्याचा अनुभव आला होता, हे तर सर्वश्रुतच आहे. मात्र, अवकाशयान अंतराळात भ्रमण करत असता, त्यातील अंतराळवीरांना शून्य गुरुत्त्वाकर्षणाचा सामना करावा लागतो. तोंडातून बाहेर टाकलेली चूळ, खाली पायाशी न पडता सरळ समोर प्रवास करत असल्याचे पाहायला मिळते. एवढेच काय, पण पाय सदैव खालीच असावेत/ असतात ह्या धारणेलाही वजनरहित अवस्थेत छेद जातो.

न्यूटन यांच्या थोड्या अगोदर होऊन गेलेल्या केप्लर व गॅलिलिओ या ज्योतिर्विदांच्या अनुक्रमे ग्रहगतिविषयक व वस्तूंच्या गतिविषयक संशोधनाचा

पाणी धावतं म्हणून त्याला मार्ग सापडतो; त्याप्रमाणे जो प्रयत्न करतो त्याला यशाची, सुखाची, आनंदाची वाट सापडते.

पूर्ण खुलासा वरील गुरुत्त्वाकर्षणाच्या सिद्धांताने करता येतो. तथापि कोणत्याही दोन वस्तू, कोणत्याही तऱ्हेची दृश्यबंधने नसताना एकमेकांस तत्काल कशा आणि कोणत्या यंत्रणेनुसार आकर्षित करतात, हे न्यूटन यांनाही ठाऊक नव्हते व आजही ते संपूर्णपणे आणि निःसंशयपणे अवगत झाले आहे असे म्हणता येत नाही. वस्तुमानाच्या अस्तित्वामुळेच गुरुत्त्वाकर्षण होते व याचा अवकाशावर अथवा कालावर काहीही परिणाम होत नाही असा न्यूटन यांचा समज होता. पदार्थ स्थूल व गोलाकार असल्यास त्याच्या बाहेर कोठेही असलेल्या अंतरातील एकक वस्तुमानावरील आकर्षण जणू काही त्या पदार्थाच्या गुरुत्त्वमध्यातून होत असते हाही उपसिद्धांत न्यूटन यांनीच मांडलेला आहे.

**महासागर ऊर्जा:** पृथ्वीवरील जवळजवळ ७० – ७५% क्षेत्रावर पाणी आहे. यांत पॅसिफिक, अटलांटिक, हिंदी इत्यादी महासागर, तसेच इतर लहान मोठे समुद्रही आहेत. या सागरसंपत्तीमध्ये दडलेल्या ऊर्जेबद्दल शास्त्रज्ञांनी अभ्यास केला आहे. पृथ्वीतलावरील पाण्यावर सूर्य आणि चंद्र यांच्या गुरुत्त्वाकर्षणाचा प्रभाव पडत असल्याने, सागरातील पाण्याला भरती–ओहोटीच्या चक्राचा अनुभव अव्याहतपणे येत असतो. भरतीच्या वेळी पाण्याची स्थितिज ऊर्जा वाढलेली असते. ओहोटी सुरू झाल्यावर पाणी ओसरत असताना या स्थितिज ऊर्जेचा वापर करून पाहिजे असलेल्या प्रकारची ऊर्जानिर्मिती करता येते. भरती–ओहोटीच्या पातळींमधील फरक जितका अधिक, तितक्या प्रमाणात ऊर्जानिर्मिती अधिक होण्याची शक्यता असते. भारताच्या पश्चिम किनाऱ्याच्या केलेल्या एका सर्वेक्षणात गुजरातच्या खंबायत आखातात भरती–ओहोटीमधील फरक सर्वांत अधिक आढळला.

समुद्रकिनाऱ्यावर रात्रंदिवस लाटा एकापाठोपाठ एक येत असतात. या लाटा म्हणजे वेगाने वाहणारे पाणीच असते. लाटांमध्ये असलेली ही गतिज ऊर्जा वापरून वीज निर्माण करण्याचे तंत्र शास्त्रज्ञांनी विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या किनाऱ्यावर लाटांची उंची आणि वारंवारता अधिक, तितकी तेथील लाटांपासून मिळू शकणारी ऊर्जाही अधिक असते. अशा जोरदार लाटांचा शोध घेऊन त्या ठिकाणी विद्युत् जनित्रे बसविल्यास किफायतशीररीत्या वीज निर्माण होऊ शकते. भारतीय तंत्रज्ञानावर आधारित काही प्रायोगिक जनित्रे केरळ राज्याच्या अरबी समुद्रकिनाऱ्यावर तिरूअनंतपुरमजवळ विझिञ्जम येथे कार्यान्वित आहेत.

गुरुत्त्वाकर्षणाने चंद्र जणू पृथ्वीच्या पायात गुंतवलेला आहे अशी, सत्याच्या अगदी जवळ जाणारी संकल्पना राजा बढे ह्यांच्या पुढील गीतातून प्रकट होते.

चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले ।
ओंजळी उधळीत मोती हासरी ताराफुले ।। धृ ।।

वाहती आकाशगंगा की कटीची मेखला ।
तेजपुंजाची झळाळी तार पदरा गुंफिले ।। १ ।।

गुंतवीले जीव हे मंजीरकी पायी तुझ्या ।
जे तुझ्या तालावरी, बोलांवरी नादावले ।। २ ।।

गे निळावंती कशाला झाकिसी काया तुझी ।
पाहु दे मेघांविण सौंदर्य तुझे मोकळे ।। ३ ।।

गीतः राजा बढे, संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर, स्वरः आशा भोसले, रागः आनंदस्वरूप हंसध्वनी

आकाशातून पृथ्वी पाहात असता, जणू काही ती चांदणे शिंपीत चालते आहे असे भासते. आकाशस्थ ताऱ्यांची फुलेच जणूकाय ती उधळते आहे असा भास होतो.

आजूबाजूस वाहाणारी आकाशगंगा तिच्या कमरेस मेखलेप्रमाणे शोभते. तेजःपुंज तारे तिच्या पदरावर गुंफलेले भासतात.

चंद्रासारखे उपग्रह (जीव) जणूकाय साखळीने (मंजीरकी) तिच्या पायात गुंतवलेले असावेत अशा प्रकारे तिच्या नादाने, तिच्या बोलांवर, तालावर नाचत असतात.

(पृष्ठ क्र. १३ वर)

# नर्मदा परिक्रमा

भाग : २९

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**शुक्रवार दि. ८ फेब्रुवारी २०१३. दिवस ७५ वा. झिरी घाट – ब्रह्माण्ड घाट (बरमान) मु. तेलंग यांचे निवासस्थान (छत्तरपूर खेडी पदम् केसाली चवरपाटा)**

काल रात्री वाटी भोजन मिळाले. ३/४ परिक्रमावासी धर्मशाळेत मुक्कामाला होतो. त्यांनी मात्र सदावर्त घेऊन स्वयंपाक केला. धर्मशाळेच्या व्यवस्थापकाच्या पत्नीने मात्र त्यांच्या भोजनाबरोबर आमचेही भोजन तयार केले होते. दीड वाटी आणि थोडी पातळ भाजी/वरण मला पुरले.

काल आश्रमात येण्यासाठी टेकडी चढून यावे लागले. मात्र सकाळी पाहिले तर आश्रमासह सर्व गावच या उंचीवर होते म्हणजेच हे पठार होते.

सकाळी हातपंपावर स्नान केले व निघालो. बन्सीचा काल संध्याकाळी फोन आला होता. तो छत्तरपूर गावात होता. आजही निघताना त्याचा फोन आला की तो आम्ही पोहोचेपर्यंत गाव सोडणार नाही.

तुहिन मित्रांबरोबर मैय्याकिनारा गाठला व अती कठीण ओल्या उभा उतार असलेल्या उंच तीरावरून निघालो. कुठल्याही क्षणी पाऊल घसरून सरळ पाण्यात पडू अशी अवस्था होती. इतक्या धोकादायक पायवाटेने मला जायची इच्छा नव्हती. परंतु मित्रापुढे निघाले म्हणून मी मागून निघालो. जीव सांभाळून तीस एक फूट गेलो आणि पायवाटच संपली. कारण वरील शेतांमधून झरणाऱ्या पाण्यामुळे तिथे इतका चिखल की पुढे जाणे अशक्य होते.

मागे फिरलो आणि पुन्हा एकदा सांभाळून थोडे थोडे वाटेच्या मुखाकडे चालू लागलो. (पावले टाकू लागलो / पाऊल पाऊल सरकू लागलो म्हणणे योग्य!) पूर्ण मागे जाणे हे तर पुढे जाण्यापेक्षाही कठीण झाले आणि सुदैवाने वर चढणारी पाऊलवाट मिळाली आणि धोकादायक रीतीने मागे जाण्याऐवजी वर चढणे अधिक सुरक्षित वाटले. द्रविडी प्राणायाम करण्याऐवजी मागे गावातून गेलो असतो तर ज्या वाटेने सहज गेलो असतो त्या वाटेला बरीच शेताडी आणि चढउतार पार केल्यावर लागलो.

छत्तरपूरजवळ बन्सीला फोन केला आणि थोड्याच वेळात एक गावकरी आमच्या स्वागतासाठी येऊन वाटेवर उभा राहिलेला दिसला.

हा गावकरी म्हणजे काल बन्सीला ज्याने रात्रीचा आश्रय व भोजन दिले तोच हा! बन्सी काल माझ्यापुढे निघून गेल्यावर कुठेतरी उंचावर चढला व फिरून फिरून पुन्हा त्याच जागी आला होता. त्याची कल्पना की या प्रकियेत गेलेल्या वेळात मी पुढे निघून गेलो असेन व तो स्वाभाविक मागे राहिला असेल.

बराच वेळ भेट नाही म्हटल्यावर त्याने फोन केला परंतु Out of Range हे उत्तर !

बन्सी चुकला असेल असे मला चुकूनही वाटले नव्हते. उलट तो माझ्यासाठी थांबलेला सापडला नाही तेव्हा मीच गैरसमज करून घेतला की तो माझ्या मंद चालीला वैतागून पुढे गेला असेल आणि आता बहुधा/ कदाचित मुक्कामी भेटेल.

घरात चहापाणी झाले. निघालो. गावकरी निरोपासाठी अर्धा कि.मी. बरोबर आले. आमच्या पाया पडले. बन्सीने त्यांना पाया पडू न देता त्यांना छातीपाशी धरले तर त्यांना अश्रू आवरेनासे झाले. आमचेही डोळे पाणावले. असे भावाश्रू या नर्मदातटीच अनुभवायास मिळतात.

गव्हाच्या शेतांमधून जाणाऱ्या पायवाटा सतत

चालणाऱ्या sprinklers मुळे इतक्या निसरड्या, चिखलमय होतात की बुटाला चिखल चिकटून वजन वाढते. त्या चुकवाव्या तर नक्कीच घसरतो.



अशा कसरती करत करत केसाली गाठले. पाणी मागितले, चहाही मिळाला. चवरापाटा गावात ज्या व्यक्तीने चहा दिला त्याचे नाव हरगोविंद पालिवाल शर्मा. ॲडव्होकेट असलेल्या या व्यक्तीने वकिली सोडली. भावंडात धाकटा, आई आता नव्वदीची, आईसाठी गावात आला आणि वडिलांचे आध्यात्मिक संस्कार जपत आता परिक्रमावासींची सेवा करतात! संसार आहे. वाट्याला असलेली जमीन ५०%ने ठेका कसून मिळणाऱ्या उत्पन्नावर सेवाव्रत व संसार दोन्ही सांभाळतात.

बरमानला पोहोचलो. ATM मधून ५००० रु. काढले. बन्सीला ५०० रु. दिले. मित्रांना ५०० रु. दिले व त्यांच्या बुटाचा खर्च व पायमोजे ३ सेट याचे ८२० रु. दिले. डोक्याला बांधण्यासाठी केशर सुती कपडा घेतला.

बन्सीचा ५वा बुटाचा जोड फाटला होता. तो काल काट्यातून चालताना पार गेला. काल मला सोडून बन्सी भटकत राहिला व संध्याकाळी दमलेल्या अवस्थेत छत्तरपूरच्या कुठे न जाणाऱ्या वाटांवर /शेतांवर असताना कुणी शेतकऱ्याने त्याला पाहिले व घरी आणले.

तुझे बुट गेले तरी माझ्याकडे चपला आहेत हे मी त्याला आधीच सांगितले होते. आज मी त्याला चपला घालायला दिल्या.

मित्रांचे बुट नवीन होते, पण एक नंबर लहान मिळाल्याने त्यांनी फार त्रास सोसला होता. (नेमावर) आज त्यांनी बूट नवीन घेतले व पहिले बूट बन्सीला दिले. माझ्या चपलाही परतल्या!

बाहेर हॉटेलमध्ये खाऊन घेतले. कारण दुपारी खाल्लेला चिवडा व बिस्किटे यावर होतो. भोजन मिळाले नव्हते.

बारमन-रामजानकी मंदिर पुजाऱ्याने पायी प्रवासी ऐकल्यावर आम्हाला तेलंगांच्या घरी आणले. आमच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था झाली. परंतु तत्पूर्वी तेलंगांनी आमचा कडक इंटरव्ह्यू घेतला होता!

संध्याकाळी ब्राह्मण घाटावर थोडे रमलो. सुंदर दृश्य डोळे भरून पाहिले. मंदिरे सौंदर्यात भर घालत होती ते कौतुक टिपले.

रात्री तेलंगाच्या घरी सुग्रास ब्राह्मणी भोजन मनसोक्त मिळाले! आम्हाला दिलेल्या जागेत दिवे नव्हते. बाहेरून मेणबत्त्या आणून लावल्या; डायरीसाठी जिथे दिवा होता, त्या मोकळ्या, प्रवेशद्वारासमोरील जागेत बसलो होतो.

**शनिवार दि. ९ फेब्रुवारी २०१३. दिवस ७६ वा. बरमानः सप्तधारा-छोटी धुवाँधार-गुरसी-रामपुरा-केरवानी २० कि. मी.**

बरमानहून पोहोचण्यासाठी छोटी धुवाँधार टेकडी चढावी लागते. टेकडी चढून आलो आणि कळले की आपण एका अती सुंदर दृश्याच्या सामीप्यात आहोत.



समोरच मैय्या आणि या छोट्या धुवाँधार बांधावरून खळाळत पाणी मैय्यामध्ये शिरून वाहात होते. ही वेगळी नदी की मैय्याच हे काही कळले नाही. परंतु हे मैय्याचेच एक रूप असते. खाली उतरलो. पाण्यात शिरून स्नान केले. तिथेच बसून मैय्यापूजन केले. नदीकाठी आणि चढून उतरलेल्या डोंगरात गुळगुळीत आणि हिरवी काळी चमक असलेले तुकतुकीत खडक पाहिले.

धुवाँधार प्रवाहाच्या बाजूने पुन्हा दुसरा डोंगर चढलो आणि गुरसी–रापुरा करत केरवानी हे २० कि.मी. वरील गाव गाठले. गावात आश्रम आहे कळले म्हणून मैय्याकिनारी असलेल्या त्या स्थानी गेलो. हा आश्रय ॐकारेश्वर आश्रमाच्या आधिपत्याखाली आहे म्हणे. तिथे विचारपूस तर नाहीच पण विचारल्यावर खिडकीच्या जाळीतूनच उत्तर आले की गावातील धर्मशाळेत जा!

मला खूप राग आला होता. तंगडतोड करत अर्धा पाऊण कि.मी. काटत दिशा बदलून गावात जायचे. कारण आश्रम उजव्या हाताला नदीकिनारी तर गाव डाव्या हाताला आतमध्ये!

धर्मशाळा दिव्य होती. साधन सामग्री नाही, ओटा झिरपता ओला, दिवा नाही, बल्ब फुटलेला, होल्डरमध्ये एकच वायर!

सदावर्त घेऊन त्याही स्थितीत छान खिचडी केली आणि एका घराने सदावर्त, बादली; तर दुसऱ्या घराने लाकडे, गोवऱ्या, मोठे पातेले, डाव हे सहकार्य केले.

मी बल्ब आणला. सगळे वायरींग नीट करून दिवा चालू केला तो मात्र बन्सीने! या गडबडीत डायरी लेखन झाले नाही (नंतर लिहिली.)

**– अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

•••

(पृष्ठ क्र.१० वरून–**शास्त्रवेध–४ : गुरुत्त्वाकर्षण)**

अवकाशात किंचितशी निळसर काया मिरवणाऱ्या हे सृष्टे, तू मेघांच्या आच्छादनाने का बरे उगाचच तुझी काया झाकून घेत आहेस? त्यांच्याविना मुक्त असे तुझे सौंदर्य मला पाहू दे. आस्वादू दे.

अशा प्रकारे, आकाशातून पृथ्वी कशी दिसू शकेल ह्याचे जाणत्या ज्योतिर्विदाने करावे तसे तपशीलवार वर्णन, ह्या कविकल्पनेत करण्यात आलेले आहे.

गुरुत्त्वाकर्षणाबाबतची कविकल्पना प्रत्यक्ष स्थितीच्या अगदी जवळ जावी, हे कवीच्या कल्पनाशक्तीचे खरेच कौतुक म्हणायचे, की गुरुत्त्वाकर्षणाचे आकर्षण कवीसही अनावर झाले म्हणायचे!

**संदर्भः**

१. मराठी विश्वकोशातील गुरुत्त्वाकर्षण विषयक लेख https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand5/index.php/component/content/article?id=9326
२. महाराष्ट्रीय ज्ञानकोश http://ketkardnyankosh.com/index.php/2012-09-06-10-42-09/7395-2013-02-09-05-49-38
३. महासागर ऊर्जा http://mr.vikaspedia.in/rural-energy/energy_types/renewable_energy/93892e94192694d930-90993094d91c93e-93893e917930940 93293e91f93e90292a93e938942928-90993094d91c93esection-1
४. आठवणीतील गाणी http://www.aathavanitli-gani.com/Song/Chadane_Shimpit_Jashi

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

कुणाची मदत करत असताना त्याचा डोळ्यात बघू नका. कारण त्याचे झुकलेले डोळे तुमच्या मनात गर्व निर्माण करू शकतो!

# ओळख वनस्पतींची
## जायफळ

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील आठवा भाग. 'जायफळ' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, मसाला म्हटले की आपल्या तोंडाला पाणी सुटते. अन मसाल्याच्या एक एक पदार्थाची आठवण झाली की भूक चाळविली जाते. अगदी पोट भरलेले असतानाही मसाल्यांच्या खमंग वासाने तो पदार्थ खाण्याची इच्छा होणार नाही अशी व्यक्ती विरळाच. मसाल्यांचा व्यापार व त्यापासून मिळणारा अमाप पैसा बघून पाश्चात्यांचीही भूक चाळविली गेली. पूर्वी खुश्कीच्या मार्गाने तुर्कस्थान मधून जाणाऱ्या रस्त्याने हा व्यापार चालायचा; परंतु नंतर अतिरेकी टोळीवाल्यांचा वाढता उपद्रव लक्षात घेता त्यांनी समुद्रमार्गे भारतात येण्यासाठी मार्ग शोधले व ते भारताच्या दक्षिणेस पोहोचले. व्यापाराच्या निमित्ताने आलेले पोर्तुगीज डच, इंग्रज यांनी येथील प्रदेशही गिळंकृत केला.

केवळ भारतच नाही तर जिथे जिथे मसाल्याची पिके घेतली जातात त्या सर्व प्रदेशात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे शिरकाव केला. या मसाल्याच्या पदार्थांतील एक महत्त्वाचा पदार्थ म्हणजे जायफळ. जायफळाचे सर्वात जास्त उत्पादन इंडोनेशियामध्ये होत असले तरी श्रीलंका तसेच केरळमध्ये जायफळाची झाडे विपुल प्रमाणात होती. आज केरळ व कर्नाटकामध्ये जायफळाची पद्धतशीर शेती केली जाते. जायफळाला आवश्यक असणारे दमट हवामान व सावलीचे किंवा विरळ प्रकाशाचे क्षेत्र कोकणात उपलब्ध आहे. सर्वच मसाल्यांच्या पिकांसाठी कोकणातील वातावरण पुरक असेच आहे. जायफळाचे झाड त्याच्या सुवासिक व औषधी गुणधर्म युक्त फळांसाठी लोकांना आवडत असले तरी मला आवडते ते त्याच्या सुंदर रंगसंगतीने सजलेल्या फळांसाठी.

या झाडांची फळे वैशिष्ट्यपूर्ण असतात. मोठ्या लिंबाच्या आकाराची ही फळे हिरव्या रंगाची व देठाजवळ निमुळती, मात्र बुडाकडे गोलसर पण रुद्र होत गेलेली. फळाची रचना थोडी चपटी व एक बाजूला फुगीर तर दुसऱ्या बाजूला पोट भरा आत गेल्यासारखे. झाडाची उंची साधारण ३ ते १० मीटर, पाने पाच ते सहा इंच लांब व १.५ इंच रुंदीची देठाकडे व टोकाकडे निमूळती होत जाणारी एकांतरीत पानांची रचना व रंग अगदी हिरव्या चाफ्याच्या पानासारखा. बरेचदा जायफळाचे म्हणून आणलेले रोपटे हिरव्या चाफ्यासारखेच दिसत असल्यामुळे जायफळाच्या ऐवजी हिरवा चाफाच आपण लावला हे उशीरा लक्षात येते. पानांचा वास घेऊनच याबाबत खात्री करता येते.

मला जायफळ आवडते ते त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण फळांमुळे. सुरुवातीस ही फळे हिरव्या रंगाची असतात. नंतर जसजशी ती पिकतात तशी पिवळ्या रंगाची होतात. पूर्ण पिकली की खोल गेलेल्या पोटासारख्या भागात एक उभी फट तयार होते व त्यामधून सुंदर लाल रंगाचे आच्छादन दिसू लागते. हे आच्छादन काहीसे जाळीसारखे असते. फटी आच्छादन असलेल्या जाळीमधून तपकीरी रंगाची लंबगोल बी दिसत असते. फळ पूर्ण सुकले की या बिया आच्छादनासह खाली पडतात. या बिया म्हणजेच जायफळ होय व लालगर्द रंगाचे आच्छादन म्हणजचे जावित्री होय. या जावित्रीला देखील मसाल्यामध्ये मानाचे स्थान आहे. ही जावित्री बीपासून सहजपणे वेगळी काढता येते. बी पूर्णपणे सुकल्यानंतरच खाली पडते. म्हणजे ते रुजू शकेल या दूरदृष्टीनेच निसर्गाने सच्छिद्र आच्छादनाची सोय केलेली असावी.

जायफळाचा उपयोग मिठाई तसेच श्रीखंडासारखे गोड पदार्थ स्वादिष्ट करण्यासाठी होतो. तसाच वेगवेगळी औषधे, सौंदर्य प्रसाधने यामध्येही जायफळाचा उपयोग होतो. जायफळाचे लोणी (Nutmeg Butter) तयार

(पृष्ठ क्र. २३ वर)

# माझी लंडन वारी

*विद्या प्रसारक मंडळातर्फे दरवर्षी लंडन येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत आलेले अनुभव व प्रवास वर्णन या लेखात विशद केले आहेत - संपादक*

लंडन म्हणजे गोऱ्या साहेबाचं शहर. या शहराविषयी बहुतेक सगळ्यांनाच आकर्षण असतं. या शहरात जाण्याची संधी मला सौ. ए. के. जोशी शाळेमुळे मिळाली. माझा मुलगा सौ. ए. के. जोशी शाळेत इयत्ता १० वीत शिकतोय. गेली दोन-तीन वर्षांपासून इतर मुलांकडून या UK Tour बद्दल आम्ही ऐकत होतो. शाळेतून दरवर्षी विद्यार्थी UK ला शैक्षणिक सहलीसाठी जातात असं ऐकीवात होतं. यावर्षी आम्हालाही तशी माहिती शाळेकडून देण्यात आली. महत्त्वाचं म्हणजे या सहलीत पालकही सहभागी होऊ शकतात अशी माहितीसुद्धा मिळाली. 'होय-नाही' करत मीसुद्धा माझ्या मुलाबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. निर्णय तर झाला आता तयारी कशी आणि काय करायची? तिथे जाऊन काय काय करायचं आहे? असे प्रश्न उभे राहिले. पण या प्रश्नाचं उत्तर देखील शाळेने एका निरोपाच्या रूपात लवकरच पाठवून दिले.

UK च्या शैक्षणिक सहलीला जाणाऱ्या पालकांची आणि विद्यार्थ्यांची VPM's च्या ऑफिसमध्ये एक मिटींग ठरवली होती. या मिटींगमध्ये डॉ. बेडेकर आणि डॉ. आगरकर सर स्वतः उपस्थित होते. त्यांनी आम्हाला ह्या शैक्षणिक सहलीचं स्वरूप, काय काय तयारी करायची, कुठल्या प्रकारचे कपडे घ्यायचे या सगळ्याबद्दल माहिती दिली. ही सगळी माहिती इतकी सविस्तर होती की तयारी विषयीचे सगळे प्रश्न आपोआपच सुटले. त्या दोघांनी आम्हाला पुढे होत राहिलेल्या ५-६ मिटींगमध्ये लंडनविषयी, ऑक्सफर्ड आणि केंब्रिजविषयी शक्य तितकी सगळी माहिती पुरवली. काही महत्त्वाच्या सूचना केल्या. आमच्याबरोबर येणाऱ्या लोकांची यादी, VISA साठी लागणारे कागद पत्रांची यादी इ. सगळे महत्त्वाचे कागद शाळेने हळूहळू आम्हाला दिले. VISA आला आणि आमचा जाण्याचा दिवसही जवळ आला.

डॉ. बेडेकरांनी सांगितल्याप्रमाणे कमीतकमी सामान घेऊन आम्ही लंडनच्या Heathrow विमानतळावर पोहोचलो. विमानतळाबाहेर आल्याबरोबर आम्ही थंडीनी कुडकुडू लागलो. स्वेटर, जाकीट चढवून आम्ही बस स्टॉपपर्यंत पोहोचलो. Oxfordला जाण्यासाठी लंडनमधील बस-स्वच्छ, नीटनेटकी, घरघर आवाज न करणारी. मला त्या बसकडे बघून खूपच कौतुक वाटलं. मग आजूबाजूचा परिसरही तितकाच स्वच्छ आणि निटनेटका असल्याचं जाणवलं. माणसांची गर्दी तिथेही होतीच आपल्याकडे असते तशी, तेवढी नसली तरी गर्दी होती. पण त्या गर्दीतही शिस्त होती. सगळे लोक रांगेत उभे होते. बस आल्यावर धक्काबुक्की न करता बसमध्ये चढले. आम्ही विमानतळावरून आलेलो असल्यामुळे बसमध्ये चढण्यापूर्वी आम्ही आमचं सामान बसच्या खालच्या भागात असलेल्या डिकीत ठेवलं. बसच्या चालकाने आम्हाला मदत केली. १०० मिनिटांचा प्रवास करून आम्ही Oxford ला पोहोचलो.

Oxford छोटंसं गाव वजा शहर; पण ज्ञानदानाच्या कार्यात अग्रेसर. तिथल्या वसतीगृहात आम्ही राहाणार होतो. (Youth Hostech Association(YHA)) वसतीगृहात मी प्रथमच राहाणार होते. इथलं वसतीगृहसुद्धा स्वच्छ, नीटनेटकं आणि आटोपशीर होते. Oxford मध्ये

आम्हाला दाखवलेली संग्रहालये बघून आश्चर्याचे धक्के बसत होते. तिथे केलेली वस्तूंची मांडणी, त्यावर असलेला योग्य तेवढाच प्रकाश, लोकांना त्या वस्तूबद्दल माहिती मिळावी म्हणून प्रत्येक वस्तूखाली लिहिलेली माहितीची पाटी, सगळंच कसं नीटनेटके. ब्रिटिशांनी केवळ त्यांच्याच नव्हे तर आपल्या (भारतीय) संस्कृतीविषयी देखील सखोल माहिती पुरवली आहे. आगरकर सर आणि डॉ. बेडेकर वेळोवेळी प्रत्येक ठिकाणांबद्दल बरीच माहिती देत होते. रोज संध्याकाळी आम्ही सगळेजण बैठकीच्या खोलीत एकत्र जमू दिवसभरात बघितलेल्या ठिकाणांबद्दल चर्चा करायचो. Oxford च्या थंड आणि शांत वातावरणात आमचे २ दिवस संपले.

आम्ही लंडनमध्ये दाखल झालो. लंडन हे शहर Oxford पेक्षा खूपच निराळं. माणसांची गर्दी, वाहनांची गजबज, पण गोंधळ मात्र कुठेही नाही. लंडन शहरातून आम्ही २ दिवस ज्ञानमंदिर Cambridge मध्ये ये-जा केली. ही सहल शैक्षणिक असल्यामुळे सगळ्या शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टी आम्हाला सांगितल्या जात होत्या. पण त्याचबरोबर तिथलं वातावरण, लोक, सोयीसुविधा यांच्याकडे लक्ष वेधलं जात होतं. भारतात कुठल्याच सोयी सुविधा नाहीत असं मी म्हणणार नाही; पण आपल्याकडे शिस्तीचा किती अभाव आहे हे तिथली शिस्त पाहिली की प्रकर्षाने जाणवते. ट्रेनमध्ये जशी आपल्याकडे गर्दी असते तशी तिथेही असते. तुलनात्मकदृष्ट्या कमी. पण तिथे प्रवाशांना प्रथम उतरू देण्याचा नियम पाळला जातो. हा साधा नियम पाळल्यामुळे गोंधळ कितीतरी कमी होतो आणि त्यामुळेच आमचा २३ जणांचा गट गर्दीच्या वेळी ट्रेनमधून प्रवास करू शकला. सरकत्या जिन्यावर उजव्या हाताला उभे राहण्याचा नियमही तसाच कटाक्षाने पाळला जातो. त्यामुळे घाईत जाणारे लोक डावीकडून पटापट जाऊ शकतात. पर्यायाने धक्काबुक्की टाळली जाते. सिग्नल यंत्रणा, कचरा टाकणे याबाबतही तिथे नियम आहेत आणि ते कसोशीने पाळण्याची सवय या लोकांना आहे. नियम पाळले गेले नाहीत तर मोठी शिक्षा होत नाही पण त्यांना ते नियम पाळणं गरजेचं वाटतं. त्यावेळेत आपणही भारतात गेल्यावर सगळे नियम काटेकोरपणे पाळलेच पाहिजेत आणि इतरांनाही तशी विनंती केली पाहिजे असं अगदी मनापासून वाटलं आणि तसं मी ठरवलं सुद्धा.

या शैक्षणिक सहलीचा मुलांना त्यांच्या भविष्यातल्या कितीतरी गोष्टी ठरविण्यासाठी भरपूर फायदा झाला आहे. गोष्टी अगदी उच्चशिक्षणापासून ते रोजनिशी लिहिण्याइतक्या छोट्याशा कामाबद्दल काटेकोर राहण्याबद्दल आहेत. रोजची कामं रोजच्या रोज आणि वेळेवर केल्याने होणारा फायदा मुलांना आणि पालकांना या सहलीनी लक्षात आणून दिला आहे. ब्रिटिश लोक किती ज्ञानपिपासू आहेत याचा प्रत्यय तिथे जाऊन आला. आपणही ज्ञानसंकलन केलं पाहिजे. हे प्रकर्षाने जाणवलं. १० दिवसांच्या या सहलीने खूप काही दिलं आहे. सगळंच शब्दात मांडणं कठीण आहे. पण मन आणि मेंदू दोन्हींही भारावून गेले आहेत. काही गोष्टी करायच्या ठरविल्या आहेत. त्या कटाक्षाने करत राहाणं यात माझी लंडनवारी सफल झाल्याचा आनंद आहे.

**- अमिता योगेश खांडेकर**

ठाणे

भ्रमणध्वनी : ९३२४०४५८२८

•••

**दिशा संपर्क दूरध्वनी**

**०२२-२५४२ ६२७०**

# परित्राणाय साधूनां

*गीतेतील चवथ्या अध्यायातील 'परित्राणाय साधूनां' या श्लोकाचे महत्त्व या लेखात सांगितले आहे - संपादक*

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।**
**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामी युगे युगे।।**

साधूच्या संरक्षणार्थ आणि दुष्टांचा नाश करण्यास युगी युगी धर्मसंस्थापनेसाठी मी जन्म घेत असतो.

गीतेच्या चवथ्या अध्यायातील सर्वांच्या परिचयाचा असलेला हा श्लोक आहे. आपणांपैकी अनेकांना हा श्लोक म्हणजे गीतेचा गाभा असाच परिचय आहे. आपणांपैकी सर्वचजण दुष्टांचा नाश करण्यासाठी परमेश्वराच्या अवताराची अपेक्षा ह्या श्लोकामुळे करतात. स्वतःचे संरक्षण परमेश्वरानी करावे अशी आशा आपण मनात करून घेतो. कारण आपण जे कर्म करतो तेच उत्तम आहे आणि तीच सज्जनता आहे असा आपणास विश्वास असतो. आपणास कित्येकदा असाच प्रश्न सतावलेला असतो की, 'मी इतका चांगला तरीही माझ्या वाट्याला दुःख आणि उपेक्षितता का? आपण आपल्या चांगुलपणाची व्याख्या स्वतःच निर्माण केलेली असते. आपल्यापैकी बऱ्याच जणांनी वरील श्लोकाचा अर्थ अंतरंगापासून जाणून घेतलेला नसतो.

परमेश्वराने ह्या श्लोकामध्ये 'परित्राणाय साधूंनां' असा उल्लेख केलेला आहे. थोडा विचार करा की 'परित्राणाय साधूंनां' ऐवजी 'परित्राणाय सज्जनां' किंवा 'परित्राणाय सामान्य' असाही उल्लेख करता आला असता की! ह्याचाच अर्थ परमेश्वराने अपेक्षिलेल्या 'साधूंच्या' परित्राणासाठी भगवंत अवतार घेत असतात. हा प्रश्न आपणास आपणच विचारावयास हवा की 'मी साधू आहे का?' आपण हाच विचार थोडा पुढे नेला तर अशी जाणीव होते की 'परित्राणाय साधूंनां' असे सांगणारा भगवंत अर्जुनाला युद्ध करण्यास प्रवृत्त करतो. तेही कुणासमोर? द्रोणाचार्य, भीष्म यांच्या विरोधात? गुरू द्रोणाचार्यांच्या सज्जनतेबद्दल? ज्ञानाबद्दल, श्रेष्ठतेबद्दल संशय घेण्यास आपण अपात्र आहोत. द्रोणाचार्यांनी आचार्य धर्म बाजूला सारून ब्रह्मास्त्राचा वापर युद्धात केला. द्रोणांच्या हातातून सुटलेले ब्रह्मास्त्र कोण जाणे किती मानवांचा प्राण हरण करू शकले असते! त्यांनी जीवनभर अधर्माचा पक्ष घेतला होता. अधर्माला साथ देऊन धर्माची स्थापना करण्यासाठी लढणाऱ्या हजारो 'साधूंना' ते मारण्यास निघाले होते. भीष्म सद्‌गुणी होते हे निर्विवाद आहे. परंतु निष्क्रीय सद्‌गुण किंवा सद्‌गुणांचा अतिरेक हे दोन्ही दुर्गुणच ठरतात. भीष्मांचे सद्‌गुण द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगी निष्क्रिय होते. वडिलांची आज्ञा ही मानलीच पाहिजे. या सद्‌गुणाच्या अतिरेकामुळे युधिष्ठिर द्यूत खेळला व त्याचा परिणाम काय झाला हे आपण सर्व जाणत आहात.

संत ज्ञानेश्वरांनी वरील श्लोकांचे निरूपण खूप सुंदर शब्दांमध्ये ज्ञानेश्वरीत मांडलेले आहे.

ते वेळी आपुल्याचेनि कैवारे । मी साकारू होऊनी अवतरे।
मग अज्ञानाचे आंधारे गिळुनी घाली।।
दैत्यांची कुळे नाशीं । साधूंचा मानू गिंवशी।
धर्मासी नीतीशी शेज भरी।।
अधर्माची अवघी तोडीं। दोषांची लिहिली काडीं।
सज्जनांकरवी गुढी शेंज भरीं।।
मी अविवेकाची काजळी। केडुनी विवेकदीप उजळी।
तैं योगिया पाहे दिवाळी। निरंतर।।

स्वसुखे विश्व कोंदे । धर्मची जगी नांदे। भक्तां निघती

दोंदे सात्विकाची।। तैं पापाचा अचळु किटे । पुण्याची पहाट कुटे। जै मूर्ती माझी प्रगटे पंडुकुमारा।। ऐसेया काजालागी। अवतरें मी युगी युगीं। परि होती वोळखे जे जगी। तो विवेकिया।।

ज्ञानेश्वरीतील परमेश्वर सज्जनांच्या कर्मातून सुखाची ध्वजा उभारतो. ह्याचाच अर्थ सज्जनता विचारांपर्यंत मर्यादित न ठेवता कर्मातून आचरितो तोच 'साधू' असतो असे ज्ञानेश्वरांना अपेक्षित आहे आणि हेंचि वोळखे जे जगी तो विवेकिया.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायात स्थिरबुद्धी मुनिंची लक्षणे वर्णन केलेली आहेत.

'दुःखेष्तनुद्विमनाः सुखेषु विगतस्पृहः।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्चते।।'

दुःखांची प्राप्ती झाल्यावरही ज्याच्या मनात उद्वेग निर्माण होत नाही. सुखामध्ये ज्याचा विवेक नाश पावत नाही. ज्याचे राग, भय, क्रोध नष्ट झालेले आहेत. तोची साधु ओळखावा. संत तुकाराम ह्या स्थितीचे वर्णन गाथेमध्ये पुढीलप्रमाणे करतात.

'इतुलें करी भलत्या परी। परद्रव्य परनारी । सांडूनी अभिलाष अंतरीं। वर्ते व्यवहारी सुखरुप ।।१।।
न करी दंभाचा सायास । शांती राहे बहुवस।
जिव्हे सेवी सुगंधरस। न करी आळस रामनामीं ।।२।।
जनमित्र होई सकळांचा। अशुभ न बोलावी वाचा।
संग न धरावा दुर्जनाचा। करी संताचा सायास।।३।।
करीसी देवाविण आस। अवघी होईल निरास।
तृष्णा वाढविसी बहुवस। कधी सुखास न पवसी ।।४।।
धरुनी विश्वास करी धीर। करिता देव हाचि निर्धार।
तयाचा वहि योगक्षेम भार। नाहीं अंतर तुका म्हणे ।।५।।

लोकमान्य टिळक गीता रहस्यामध्ये म्हणतात की जो मनुष्य साम्यबुद्धीने कर्मफलांमध्ये आसक्ती न ठेवता कर्म करीत असतो तोच साधू होय.

समर्थ रामदास स्वामी दासबोधात खालीलप्रमाणे उपदेश करतात–

दुसऱ्याच्या दुःखे दुखवावे परसंतोषे सुखी व्हावे
प्राणिमात्रांस मेळवून घ्यावे। बरव्या शब्दे।
बहुतांचे अन्याय क्षमावे, बहुतांचे कार्यभान करावे।
आपल्या परीस व्हावे परावे जन।
दुसऱ्यांचे अंतर जाणावें। तदनुसारचि वर्तावें।
लोकांस परीक्षीत जावे। नाना प्रकारें।।
आलस्य अवघाच दवडावा यत्न उदंडची करावा।
शब्दमत्सर न करावां। कोणीयेकाचा।
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा शब्द निवडून बोलावा।
सावधपणे करीत जावा। संसार आपला।

'धर्मसंस्थापनार्थाय' मधील धर्म म्हणजे 'रिलीजन' असा नाही. गीता गाडगे महाराजांनी सांगितलेल्या माणूसकीच्या धर्माबद्दल आणि निष्काम कर्माबद्दल उपदेश देते. एकदा एक मनुष्य रस्त्याने जात होता. वाटेत त्याला एक गरीब मनुष्य दिसला. अंगावर फाटलेले वस्त्र नेसलेला आणि भुकेने तळमळणारा तो मुलगा पाहून मनुष्याला देवाचा राग आला. त्याने देवाला विचारले, 'देवा, तू ह्या मुलासाठी काहीच का करीत नाहीस?' जवळून जाणाऱ्या साधूने हे ऐकले आणि तो म्हणाला 'देवाने ह्या मुलासाठी काहीतरी करुन ठेवले आहे ते म्हणजे देवाने तुला आणि मला निर्माण केले आहे त्याच्या मदतीसाठी.

'जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परे पडो। मैत्र जीवांचे।।

**– प्रा. महेश मनोहर भानुशाली**
B.E.(MEG)M.M.S.
डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे
भ्रमणध्वनी – ८२३७१०२५४१

•••

# विद्यार्थ्यांशी संवाद

*शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील सुसंवादाचे महत्त्व विशद करणारा लेख - संपादक*

मदरने पाँडिचरीच्या आश्रमामध्ये शाळा काढली होती. या शाळेत जे निरनिराळ्या प्रकारचे शिक्षण मिळे, तेथे जे विविध कार्यक्रम होत, उपक्रम केले जात त्यांचे महत्त्व व वैशिष्ट्य शाळेतील मुलांच्या व शिक्षकांच्याही लक्षात यावे व त्यांनी जाणीवपूर्वक या प्रक्रियेत भाग घ्यावा म्हणून त्या मुलांबरोबर, शिक्षकांबरोबर बोलत असत.

मदर मुलांना सांगत असत की, तुम्ही या आश्रमाच्या शाळेत दाखल झाला आहात ही शाळा तुम्हाला केवळ सर्टिफिकेट (प्रमाणपत्रे) मिळवून देण्यासाठी स्थापन केलेली नाही. तुम्ही ''दैवी कामास'' पात्र व्हावे, ती योग्यता तुमच्यात यावी यासाठी आपण ही शाळा चालवतो. त्यामुळे इथे शिकत असणाऱ्या तुम्हा विद्यार्थ्यांची दृष्टी निराळीच असली पाहिजे. अभ्यासाचा कंटाळा, कठीण विषय, कठीण भाग याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती, एकमेकांच्या चहाड्या सांगणे, दुसऱ्याचा मत्सर करणे या वृत्ती आपल्यात नसल्या पाहिजेत. या शाळेचे जे Spirit (दैवी उद्दिष्ट) आहे त्याकडे तुमचे लक्ष हवे.

प्रत्येक घटना, प्रसंग, माहिती यांतून आपल्याला काही शिकावयास मिळत असते. ही शिकण्याची, जाणून घेण्याची, समजण्याची वृत्ती तुम्ही वाढवली पाहिजे.

स्वतःचा लहानपणीचा अनुभव म्हणून त्यांनी एकदा मुलांना एक गोष्ट सांगितली. मी तुमच्या वयाची होते त्यावेळेस माझा अभ्यास मी खूप मन लावून करायची. माझ्या आईचे माझ्यावर व माझ्या भावावर खूप प्रेम होते. परंतु आम्ही कधी कधी आळशीपणाने वागायचो. कधी कधी अगदी निरुत्साही दिसायचो. अशा वेळेस आईला फार राग येई. आम्ही आळशीपणाने वेळ काढू लागतो तर ते तिला आवडत नसे. आम्ही कधी एखादी तक्रार घेऊन तिच्याकडे गेलो, अमुक एक धडा, विषय कठीण वाटतो-आवडत नाही असे सांगितले की ती आमची चेष्टा करायची. आमची निर्भत्सना करायची व आम्हाला सांगाची, 'अरे, किती मूर्ख आहात रे तुम्ही, सारखे 'मी मी माझे माझे' याने मन लडबडून ठेवता. असे 'मी मी, माझे माझे' आत्मकेंद्रितपणे बावळटपणाने वागू नका, बोलू नका. नेहमी good mood, bad mood असे moody (मुडी) होऊ नका. जा आणि कामात जीव ओतून काम करा. मला तुमचे असले आळशी, निरुत्साही, आत्मकेंद्रीत बोलणे वागणे मुळीच आवडत नाही. माझ्यावर माझ्या आईचे फार उपकारच आहेत. माझ्या आईने मला पुस्तकी असे काही शिकवले नाही. परंतु आळशीपणा, सारखी कुरकुर करणे, तक्रार करणे, स्वतःच्याच विचारांत रमणे याची सतत निंदा केली व काम करणे, कामांत रस घेणे याचे महत्त्व पटवून आनंदाने काम करण्याचे कौशल्य शिकवले. शिस्तीने वागण्याचे शिकवले. यामुळे माझ्या पुढील आयुष्यात फार फायदा झाला आहे. मदर मुलांना सांगत, अरे तुम्ही सारखे स्वतःविषयी कसली बडबड करता? त्यापेक्षा आपले काम मग ती चित्रकला असो, संगीत असो, नावडते गाणे असो ते सुधारण्याची का खटपट करीत नाही. आपली शक्ती उगाच फुकट का घालवतो. आपल्या मेंदूचा व मनाचा विकास होण्यासाठी कष्ट व शिस्तबद्ध कामाची सवय लावून घेणे जरुरीचे असते.

तुम्ही चांगले ८/९ तास मन लावून काम करून पाहा. तुमच्या अन्नाला चव येईल. झोप शांत लागेल व आपण सुखी की दुःखी हे कुरवाळत बसण्यास सवडच मिळणार नाही.

दैनंदिन जीवनातील आपले प्रश्न घेऊन ते आपण मानसिक शक्तीने कसे सोडवू शकतो हे उदाहरणे देऊन पटवून देणे हा मदर यांच्या विवेचनातील मार्गदर्शक भाग असे.

एकदा एकाने त्यांना विचारले, मदर तुम्ही सांगता की, काम उत्कृष्ट करण्याचा नेहमी प्रयत्न केला पाहिजे. परंतु आम्हाला उत्कृष्ट काम करण्याइतका वेळ नसतो. अशा वेळेस आम्ही घाईघाईने काम करतो. कमी वेळात उत्कृष्ट काम कसे करता येईल? झटपट पण चांगले काम करण्याची युक्ती काही आहे का?

मदर या प्रश्नावर अतिशय खूष झाल्या. त्या म्हणाल्या की वेळ थोडा असूनही काम उत्कृष्ट करता येते. वेळ थोडा असताना काम करणाऱ्या माणसाचे काम एक तर अपुरे राहते व पुरे करू म्हटले तर त्यात बऱ्याच चुका होतात. असा तुम्ही सांगता असा बहुतेकांचा अनुभव असतो हे खरे, परंतु यातून मार्ग काढता येणे हे दैनंदिन जीवन जास्त समृद्धपणे जगण्यासाठी मात्र आवश्यक आहे. काम अर्धवट राहू नये तसेच ते bad (चुकीचे, ओंगळ) होऊ नये म्हणून मी एक तिसरी काम करण्याची पद्धत सुचविते. समजा आपल्याला अर्धा तासच वेळ आहे तर यातील १५ मिनिटांतच आपले काम उत्कृष्ट रीतीने उरकता येईल अशी ही एक युक्ती आहे.

काम करताना आपली 'एकाग्रता जबरदस्त तीव्र करणे' हीच ती युक्ती. समजा तुम्हाला आंघोळ करून विशिष्ट वेळेला तयार व्हायचे आहे. आता समजा हे काम घाईने न करता चांगल्या रीतीने करण्यास अर्धा तास लागतो. जर तुम्ही घाईत असाल तर काय होईल की तुम्ही आंघोळ कशीतरी कराल, अंग नीट चोळणार नाही, साबण लावणार नाही, अंग नीट पुसणार नाही, नंतरचा व्यायाम करणार नाही, अगर कपडे घालणे, भांग पाडणे या गोष्टी व्यवस्थित करणार नाही. म्हणजे तुमच्याकडून या गोष्टी घाईमुळे व्यवस्थित होणार नाहीत. आता अशा वेळी तुम्ही काय केलेत, कसे काम केलेत तर झटपट पण चांगले काम होईल तर तुम्ही वेळेचे भान ठेवावे हे खरे. पण उतावीळपणा करू नका. आपल्या मनाची एकाग्रता तीव्र करा. आपली सर्व मानसिक शक्ती एकत्रित करा. आपण करीत असलेल्या कामावर, प्रत्येक छोट्या बिंदूवर एकाग्र व्हा व कामाची उत्कृष्ट हालचाल करीत राहा. मी हा अनुभव स्वतः घेतला आहे. म्हणून खात्रीने बोलू शकते. तुम्ही या युक्तीचा अनुभव घेऊन पाहा. तुम्हाला ज्या कामास अर्धा तास लागत असते तेच काम १५ मिनिटांत उरकलेले अनुभवता येईल. याचे कारण असे आहे की, कामात एकाग्रतेची जोड मिळाल्यामुळे त्याची गती व Perfection (सौंदर्य) बदललेले असते.

चटकन एकाग्र होता येते व त्याची तीव्रता वाढवता येते. या गोष्टी प्रयत्नाने साध्या आहेत आणि एकाग्रता वाढू लागली की मग तोंड धुणे, कपडे धुणे, केर काढणे इत्यादी सर्व दैनंदिन व्यवहाराची कामे, तुम्ही करत असलेला अभ्यास, तुम्ही खेळताना तुमचे चापल्य या सर्वांनाच एक गतिमान लय येईल.

आश्रमातील विद्यार्थ्यांनी कोणत्या विषयाची निवड करावी याबद्दल मोकळीक होती. मात्र आपल्या आवडीचा विषय निवडल्यावर मात्र तो अभ्यास शिस्तीने, नेटाने, जिद्दीने झालाच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. वर्गात गोंगाट करणे, उगाचच गैरहजर राहणे या गोष्टी विद्यार्थ्याने टाळल्याच पाहिजेत. शिस्त व जिद्द हे गुण आत्मसात करणे अगदी आवश्यक.

सर्वच मुलांना 'गणित' हा विषय कठीण व कंटाळवाणा वाटतो. या संदर्भात त्या मुलांना म्हणाल्या, 'असे पहा की, आपले व्यवहार चांगले करण्यासाठी, जगण्यासाठी, कितीतरी गोष्टींची माहिती असणे आवश्यक असते. त्यातील 'गणित' हा अत्यंत एक महत्त्वाचा विषय आहे. आपणास जो विषय आवडतो त्याचाच अभ्यास करावयाचा ही वृत्ती योग्य नाही. जी गोष्ट महत्त्वाची व आवश्यक आहे, ती गोष्ट मला आलीच पाहिजे अशी आग्रही वृत्ती ठेवली पाहिजे. महत्त्वाची व आवश्यक गोष्ट करता न येणे म्हणजे आपल्यातील अपुरेपणा चालवून

---

एखादी चांगली गोष्ट मुळीच न करण्यापेक्षा ती कमी प्रमाणात करणे किंवा सावाकाशीने करणे श्रेयस्कर.

घेणे. ही गोष्ट आपण कधीही सहज करता कामा नये. अशा वृत्तीने 'गणित' या विषयाकडे पहाल तर गणित हे साहस वाटेल व मग त्यात आनंद मिळेल.

इतिहास व भूगोल यात आम्हास मौज वाटत नाही. असे काही मुले एकदा म्हणाली. 'मदर' म्हणाल्या, 'असे पाहा, आपण ज्या पृथ्वीवर राहतो, वाढतो, खेळतो त्या पृथ्वीविषयी आपणास कुतूहल वाटले पाहिजे. तुम्ही ही 'उत्सुकता' कुतूहल वृत्ती, जिज्ञासा न ठेवता जर इतिहास, भूगोल वाचाल तर ते कसे आवडतील? ज्ञानाची तहान लागत नाही म्हणून तुम्ही असे 'नीरसपणे' या विषयांचा तिटकारा करता. पृथ्वीवर प्रेम करा. आपोआपच हे विषय तुम्हास गुंतवून ठेवतील, आवडायला लागतील.

असाच प्रश्न एकदा 'संस्कृत' या विषयासंबंधी निघाला होता. मदर म्हणाल्या होत्या– भारतात राहणाऱ्या प्रत्येकास 'संस्कृत' भाषेची ओळख असलीच पाहिजे. 'पंडितांचे संस्कृत' नाही तर 'संस्कृत भाषेची' ओळख. संस्कृत भाषेची ओळख असली की भारतातील सर्व भाषांच्या जननीची ओळख होते व सर्व भाषा आपल्याला आवडू लागतात. भाषेविषयी आपलेपणा उत्पन्न झाला की त्या माणसांविषयी आपलेपणा वाढतो.

शारीरिक शिक्षण व खेळ यांना जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे असे त्यांना वाटत असे. शारीरिक शिक्षण म्हणजे सर्व प्रकारच्या व्यायामाचा परिचय. नियमित व्यायामामुळे आपले शरीर सुस्थितीत राहण्यास व डौलदार वाढ होण्यास फार मदत होते.

खेळ या संज्ञेत सर्व खेळांचाच समावेश होतो. खेळांमुळे मनोरंजन होते. व्यायाम होतोच परंतु व्यायामाबरोबर शारीरिक व मानसिक चापल्य निर्माण होते. हे साध्य करण्यासाठी मॅचेस घेतल्या जातात. खेळात शर्यती, स्पर्धा असतात. कोणती टीम सर्वोत्कृष्ट आहे हे ठरवावयाचे असते. त्याचप्रमाणे विजेत्या संघास पारितोषिके द्यावयाची असतात. खेळ व व्यायाम यातील फरक लक्षात ठेवला पाहिजे. खेळ वैयक्तिक असतात तसे गटाचे, समुहाचे प्राविण्यासाठी ही Organise केले जातात.

मदर यांचे शिक्षण व खेळ याविषयीचे असे विचार असल्याने पाँडिचरीच्या आश्रमामध्ये शारीरिक शिक्षण व खेळ या दोघांसही सारखेच महत्त्व देण्यात आले आहे. लहान वयात, तरुण वयात नेटाने प्रयत्न करण्यासाठी, कष्ट करण्यासाठी काहीतरी उत्तेजन द्यावे लागते व म्हणूनच त्यांच्या अंतर्गत बक्षिसे देणे, सर्टिफिकेटस् देणे केले जाते. त्यामुळे कष्ट व प्रयत्न यांची सवय लागते असे त्याचे स्पष्टीकरण करतात.

एका मुलाने प्रश्न विचारला की 'आपण जिंकण्यासाठीच खेळले पाहिजे का? खेळातील नैप्युण्य मिळविण्यासाठी जिंकण्याचीच ईर्षा ठेवली पाहिजे का? नाहीतर हे शक्य होणार नाही असे तुम्हास वाटते का?'

मदरनी त्या मुलाला सांगितले, 'तुझा प्रश्न महत्त्वाचा आहे. माझे उत्तर जरा प्रौढ आहे. म्हणून मी काय सांगते ते नीट समजून घेण्याचा प्रयत्न कर. खरं सांगू का, आपले मानसिक वय किती आहे त्याच्याशी प्रश्न संबंधित आहे. तीन-चार वर्षांचे मानसिक वय ज्याचे आहे (अशी मोठी माणसेही असतात) त्यांना सतत कष्ट करणे, शिस्त लावून घेणे या गोष्टीत मन लागत नाही. कारण त्यांची जाणीव प्रगल्भ नसते. त्याच्यासाठी पारितोषिकं, ढाल, सर्टिफिकेट इ. आवश्यक आहेत. कारण त्यामुळे अशी माणसे, मुले उत्साहाने काम करू लागतात. त्यांचा आळस घालवणे, निरुत्साह घालवणे, त्यांना कार्यप्रवण करणे यासाठी ही पदके उत्तेजक ठरतात. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, वयाच्या पन्नाशीची माणसेही मानसिक दृष्ट्या ३-४ वर्षांची, निरुत्साही असतात बरं.

बक्षिसाचे लक्ष्य ही निरुत्साह घालवण्यासाठी केलेली युक्ती आहे. ती एक पहिली पायरी आहे. मात्र त्यामुळे त्यापुढे जिंकण्यासाठीच खेळावयाचे ही वृत्ती सोडायची असते. खेळातील आपले प्रावीण्य, नैपुण्य यातून आपल्या आंतरिक प्रौढतेची अभिव्यक्ती होत

---

प्रश्न सुटण्यासारखा असेल तर काळजी नका करु आणि तो न सोडवता येणारा
असेल तर काळजी करुन काय होणार ?

असते. आपले आंतरिक सुप्त गुण प्रकट होतात. ते आपणास दिसतात व ते आपणास वाढवता येतात.

मी ज्यावेळेस आठ वर्षांची होते, त्यावेळेस टेनिस खेळण्यासाठी माझ्यापेक्षा कौशल्य संपन्न प्रतिस्पर्धी भिडूची मी निवड करीत असे. माझ्यापेक्षा कमी दर्जाचा खेळाडूवर विजय मिळवणे मला मुळीच आवडत नसे. अशा खेळाडूशी खेळण्याने मला काहीच शिकण्यास मिळणार नाही असे मला वाटे. माझ्या खेळाचा खरा कसच लागणार नाही असे मला वाटे. म्हणून मी श्रेष्ठ दर्जाच्या खेळाडूंबरोबर खेळण्यासाठी हट्ट धरे. ते मला हसत, पण खेळण्यास तयार होत. त्यांच्याबरोबर खेळताना मी कधीही जिंकले नाही हे खरे. परंतु त्यामुळेच मला खेळांतील बारकावे समजले. त्यातील मेहनत व कलात्मकता समजली. मी हरले. परंतु मी कितीतरी शिकले. मला वाटते की खेळातील पदके, स्तुती, यश यापेक्षाही खेळातील आनंद, कला, नैपुण्य, त्यातून मिळणारे शारीरिक तेज व चापल्य यासच आपण महत्त्व दिले पाहिजे. पण मानवजात अशी पक्व होण्यासाठी ती कार्यप्रवणतरी झाली पाहिजेना. आपले सर्वस्व पणाला लावून कष्ट करण्याची दृष्टी तिच्यात आली पाहिजे व त्यासाठी पहिली पायरी म्हणून या 'यश, ढाल, सर्टिफिकेटंस् यांचा उपयोग करून घ्यावा लागतो. यापेक्षा यास खास महत्त्व नाही. स्पर्धेत भाग घेण्याचे ठरविले व यशासाठी प्रयत्न करावयाचे असले तरी खेळताना काही गोष्टींवर निष्ठा असलीच पाहिजे. आपण खोटा खेळ खेळणार नाही, खेळताना फसवणार नाही, खेळाचे नियम तंतोतंत पाळू या नैतिक निष्ठा असाव्याच लागतात. खेळांतील यश मिळणे अशी इच्छा असतानाही जे खरोखर श्रेष्ठ आहे त्याच व्यक्तीस, संघास मान मिळालाच पाहिजे अशी वृत्ती ठेवली पाहिजे. सामुहिक खेळामध्ये मी माझ्या एकट्याच्याच खेळास, मोठेपणास महत्त्व देणार नाही अशी संघ भावना ठेवली पाहिजे या निष्ठांना मी संघातील Right Spirit असे म्हणते. स्पर्धेत भाग घेताना आपण जागृत (Right Spirit) असू तर आपणास आपले Wickness (कुठे चुकते, काय चुकते) कळते. आपल्या शक्ती व वैयक्तिक निष्ठा निवास करण्यास उपयुक्त ठरतात. अशा दृष्टीनेच आपण खेळ व खेळातील स्पर्धा याकडे पाहिले पाहिजे.

यावर एका मुलाने विचारले, 'मदर माझे शरीर माझे इच्छेला साथच देत नाही. माझ्या शरीराला मी जास्त त्रास देऊन खेळावे का? का असे केल्यास ते आजारी पडेल, मोडेल. माझी शारीरिक क्षमता कशी वाढेल?' यावर मदरने त्याला सांगितले, 'आपले शरीर विकासक्षम आहे व हळूहळू पूर्वी न करता आलेल्या गोष्टी ते करू शकते. परंतु आपली अशी उताविळता असते की आपल्यात ताबडतोब झटपट बदल व्हावा. परंतु शारीरिक बदलाची विकासाची एक गती असते. त्याला एक सांधिक ताल असतो. शरीरामध्ये बदल घडवून आणणारी शक्ती ही जाणती व विश्वसनीय असते. आपला यावरच विश्वास नसतो. शरीराची समज व ताल हळूहळू वाढतो. परंतु घिसाडघाईने उताविळपणाने शरीराचा ताल, तोल जातो व ताण निर्माण होतो. त्यातून आजारपण, विकृती निर्माण होतात. यासाठी बदलाची ईर्षा ठेवावी लागते हे खरे. परंतु विवेक व मानसिक तोलही सांभाळावा लागतो. सारखी स्वतःची निर्भत्सना करून शरीराला, मनाला शिक्षा देऊन आपण त्याच्या विकासक्षमतेची प्रक्रिया उताविळपणाने कमी मात्र करतो. ह्या गोष्टी समजून घेणे आवश्यक आहेत.

शिक्षणाचे महत्त्व काय आहे असा प्रश्न अनेकदा निघत असे. काय शिकावे व कमीतकमी किती शिकावे, शिक्षण द्यावे, घ्यावे असा प्रश्न विद्यार्थी व शिक्षक यांचेबरोबर चर्चा करताना उत्पन्न होत असे. याबाबत मदर सांगते की, Without knowledge and Intelligence one is not a man but anual in the human form. (माहिती व बुद्धी या दोन्ही गोष्टी नसतील तर मनुष्य म्हणजे मनुष्यवेश धारण केलेला एक प्राणीच आहे)

तेव्हा चांगले वाचता येणे, चांगले लिहिता येणे एखादी भाषा तिच्या लावण्यासह आपणाशी असणे, भूगोलाची ओळख असणे, नवीन विज्ञान व शास्त्र यांचे

Overall View (तोंड ओळख, रुपरेखा) असणे, वागणूकीचे नियम माहीत असणे, सदाचाराची सवय असणे या गोष्टी स्वतःसाठी समाज स्वास्थ्यासाठी व समुहात, समाजात राहण्यासाठी कमीतकमी आवश्यक आहेत.

साहाजिकच पुढे आधुनिक विज्ञानाने आपल्याला काय दिले याबाबत चर्चा होई. मदरने एकदा सांगितले होते, 'आधुनिक विज्ञानाने तांत्रिक ज्ञान दिले आहे व आपले जीवन सुखी करण्यास हातभार लावला आहे हे तर खरेच आहे. परंतु यापेक्षाही जास्त महत्त्वाचे आधुनिक विज्ञानाने काय दिले असेल तर जे दिसते तेच तेवढेच खरे नव्हे अशी आपला समाज वाढवण्यासाठी विज्ञानाने बौद्धिक बैठक दिली आहे. तुम्ही एखादी वस्तू पाहाता. त्यावेळेस तुमच्या डोळ्यांनी जे पाहतो, कानांनी ऐकतो, त्वेचेने स्पर्श करतो त्याच्या पलीकडे सूक्ष्म अणू व पेशी यांनी बनवलेले असे हे जग आहे. ते प्रचंड वैविध्यपूर्ण आहे असे विज्ञान सिद्ध करते. माझ्या इंद्रिय ज्ञानाच्या पलीकडे 'सत्य' वावरत आहे हे विज्ञानाचा अभ्यास करताना आपल्याला सुचवित असते. मला वाटते शास्त्रज्ञांनी लावलेल्या अनेक शोधांपेक्षा त्यांच्या संशोधनातून व्यक्त होत असलेला हा विचार जास्त महत्त्वाचा आहे. शास्त्राचा अभ्यास आपणास 'सत्याच्या' खरोखरच्या अस्तित्वाच्या जवळ नेण्यास मदत करतो. त्यामुळे शास्त्राचा अभ्यास व शास्त्रीय अभ्यास हा महत्त्वाचा आहे. आपले मन आपली जाणीव विशाल करण्यास शास्त्र हे आपणास मदतच करीत असते. असे आपले मत 'मदर' यांनी दिले आहे.

असे हे सुसंवाद किती मार्मिक व प्रौढ विचार. किती गोडव्याने भरलेले. 'मदर'ना प्रणाम. इति.

**– प्रा. ह. श्री. परांजपे**
ग्रंथपाल (निवृत्त), बेडेकर कॉलेज, ठाणे.
बी-२०४, मारुती दर्शन सोसायटी,
आदिशंकराचार्य मार्ग, I.I.T. मेन गेटसमोर,
पवई, मुंबई - ७८.

•••

(पृष्ठ क्र. १४ वरून – **ओळख वनस्पतींची**)

करुन ते औषधासाठी तसेच सौंदर्य प्रसाधने तयार करतांना त्यात वापरतात. युरोपात ते बटाट्याच्या पाककृतीत वापरतात तसेच तयार मांसाहारी पदार्थातही वापरतात. वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या पद्धतीने याचा वापर होतो. सुवासिक द्रव्यांसाठी जायफळाला खूप मागणी आहे.

अपचन, नॉशिया, वात, संधीवात, डोकेदुखी, इंसोमनीया इत्यादी आजारामध्ये औषध म्हणून देतात. कोणतीही औषधी केवळ माहितगार व्यक्तींकडूनच किंवा त्यांच्या सल्ल्यानेच घ्यावी. जायफळाचे औषधी उपयोग भारतीयांना फार पूर्वीपासून माहित आहे. ज्या ज्या ठिकाणी याची लागवड करणे शक्य आहे त्या त्या ठिकाणी रोपे लावून लागवड करणे शक्य होईल त्या त्या ठिकाणी इतर झाडांसोबत लावावी.

खरोखरच जायफळ हे बहुगुणी व बहुउपयोगी फळ आहे. याचे शास्त्रीय नाव Myristica fragrans असून Nutmeg या इंग्रजी नावाने सर्वत्र ओळखले जाते. भारतात मात्र जायफळ म्हणूनच परिचित आहे. या झाडास दमट हवामान मानवते. कोकणात असे वातावरण आहे. शिवाय झाडे खूप असल्याने जायफळाच्या पिकास आवश्यक असणारा विरळ प्रकाश तिथे आहे. त्यामुळे जायफळाच्या शेतीस कोकणात खूप वाव आहे. काही लोकांनी प्रयोग म्हणून या झाडाची लागवड केली आहे व त्यांना खूप चांगले परिणाम दिसून आले आहेत. या प्रयोगशील शेतकऱ्यांमध्ये माहिम येथील श्री. अनंत नाना राऊत यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यांनी या पिकावर वेगवेगळे प्रयोग करून जायफळ उत्पादनात चांगले यश मिळविले आहे. त्यांची इतरांना मार्गदर्शन करण्याची सदैव तयारी असते. अशा अनुभवी व्यक्तींच्या ज्ञानाचा इतरांनी अवश्य लाभ घ्यावा. शेवटी एक सुंदर व बहुपयोगी वृक्ष आपल्याकडे असल्याचा आपल्यालाही अभिमान वाटेल.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंकरोड,
मुलंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३६०५२

# युरोपच्या संघातून युनायटेड किंगडमची नाट्यमय 'एक्झीट' - 'ब्रेक्झीट'

*नुकत्याच युनायटेड किंगडम ह्या युरोपीयन देशात युरोपच्या संघातून बाहेर पडण्याच्या मुद्यावरुन झालेल्या जनमत कौलाची चर्चा करणारा लेख - संपादक*

२३ जून २०१६ हा दिवस युरोपमधील युनायटेड किंगडम (United Kingdom UK) ह्या देशाच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाचा दिवस ठरला. युनायटेड किंगडम ह्या देशाला ग्रेट ब्रिटन ह्या नावाने देखील ओळखले जाते. ह्या देशात प्रामुख्याने इंग्लंड, वेल्स, उत्तर आयर्लंड व स्कॉटलँड ह्या प्रांतांचा समावेश होतो. जगभरातील अनेक लोक ह्या देशाला इंग्लंड म्हणून देखील संबोधताना दिसतात. खरे पाहता असे म्हणणे चुकीचे आहे कारण अगोदर नमूद केल्याप्रमाणे ह्या देशाचे खरे नाव युनायटेड किंगडम वा ग्रेट ब्रिटन आहे व इंग्लंड हा त्यातील एक भाग आहे. हे सर्व येथे नमूद करण्याचे कारण म्हणजे इंग्लंड, वेल्स, उत्तर आयर्लंड व स्कॉटलँड या प्रांतातील लोकांच्या प्रांतीय अस्मिता व भावना अतिशय तीव्र आहेत. त्यामुळे स्कॉटलंड मधील माणसाला इंग्रज (इंग्लीश) म्हटलेले रुचत नाही तो स्वतःस स्कॉटीश म्हणवून घेण्यात सार्थ अभिमान बाळगतो वा मानतो. हीच तऱ्हा इंग्लंड, वेल्स व उत्तर आयर्लंडमधील लोकांची देखील आहे. असो तर २३ जुन २०१६ हा दिवस युनायटेड किंगडमच नव्हे तर संपूर्ण जगाच्या इतिहासातील अतिशय महत्वाचा दिवस ठरला आहे. याचे कारण म्हणजे ह्या दिवशी युनायटेड किंगडम वा ग्रेट ब्रिटनमध्ये ह्या देशाने युरोपच्या संघात (युरोपियन-युनियन-European Union) राहायचे की बाहेर पडायचे या प्रश्नावरील जनमत कौलाचा निकाल (Public Opinion) लागला व ह्या देशातील ५२% जनतेने ब्रिटनने युरोपच्या संघातून बाहेर पडावे ह्या बाजूने कौल दिला. हा कौल बहुसंख्य म्हणजेच बहुमतांचा असल्याने ब्रिटन सरकारला आता युरोपच्या संघातून बाहेर पडावे लागणार आहे. युनायटेड किंगडमचे हुजुर पक्षाचे पंतप्रधान डेव्हिड कॅमरॉन हे ब्रिटनने युरोपियन संघात राहावे ह्या मताचे असल्याने त्यांनी आपली नैतिक जबाबदारी म्हणून लागलीच राजीनामा देण्याची घोषणा केली होती. डेव्हिड कॅमरॉन यांच्यानंतर लंडनचे माजी महापौर बोरीस जॉनसन हे ब्रिटनचे पंतप्रधान होण्याची दाट शक्यता वर्तविली जात होती. डेव्हिड कॅमरॉन यांची राजीनामा देण्याची तयारी म्हणजे ब्रिटनमधील परिपक्व लोकशाहीचे व राजकारणातील नैतिकतेचे उत्तम उदाहरण आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. भारतासारख्या देशात नैतिक जबाबदारी स्विकारुन राजकारण्यांनी सत्तेची पदे सोडून देणे हे इतिहासजमा झाले आहे असे म्हणणे देखील अतिशयोक्ती ठरु नये.

ब्रिटनच्या जनतेने युरोपच्या संघातून बाहेर पडण्याच्या दिलेल्या 'कौलाला' इंग्रजीत 'ब्रेक्झीट'-Brexit असे म्हटले गेले. Brexit चा साधा व सरळ अर्थ म्हणजे Britain's Exit from European Union-म्हणजेच ब्रिटनचे युरोपच्या संघातून बाहेर पडणे हा होय. 'ब्रेक्झीट'चा परिणाम पूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर व आर्थिक उलाढालींवर झालेला दिसला. आपला मुंबई शेअर बाजार ९४० अंकांनी कोसळला. अशाच प्रकारचा मोठा आर्थिक झटका जगभरात लागला. ह्याचे कारण हे की, युनायटेड किंगडम हा जगातील अत्यंत प्रगत देशांपैकी एक देश असून त्याचे जगातील एकूण व्यापारात व अर्थव्यवस्थेत फार मोठे स्थान आहे.

---

रस्ता सुंदर आसेल तर नक्की विचारा तो कोठे जातो, पण ध्येय सुंदर असेल तर मात्र रस्ता कसा आहे हे बघू नका त्या रस्त्यावर चालत रहा.

युनायटेड किंगडममध्ये गेल्या दोन वर्षात झालेला हा दुसरा जनमत कौल होय. यापूर्वीचा जनमत कौल २०१४ साली झाला होता. मात्र २०१४ सालचा जनमत कौल फक्त स्कॉटलंड ह्या प्रांतापुरताच मर्यादित होता. स्कॉटलंड ह्या प्रांतात फार पूर्वीपासून युनायटेड किंगडम मधून वेगळे व्हावे व स्कॉटलंड हा स्वतंत्र देश निर्माण व्हावा अशा प्रकारचा विचार करणारा फार मोठा गट वा जनसमूह आहे. त्यामुळेच २०१४ साली स्कॉटलंडमध्ये, स्कॉटलंडने युनायटेड किंगडम मध्येच राहावे की बाहेर पडावे ह्या प्रश्नावर जनमत कौल घेण्यात आला होता. ह्या ऐतिहासिक जनमतात स्कॉटीश (स्कॉटलंडच्या लोकांना स्कॉटीश असे संबोधले जाते) जनतेने युनायटेड किंगडम मध्येच राहण्याचे पसंत केले होते. ह्या विषयावर प्रस्तुत लेखकाने 'दिशा'च्या सप्टेंबर २०१४ च्या अंकात 'स्कॉटलंडमधील ऐतिहासिक जनमत कौल' ह्या शिर्षकाने एक लेख देखील लिहिला होता. स्कॉटलंडमधील ह्या जनमतकौला नंतरचा २०१६ चा हा 'ब्रेक्झीट'चा कौल देणारा युनायटेड किंगडम मधील अतिशय महत्वाचा जनमतकौल आहे.

युनायटेड किंगडम जागतिक अर्थव्यवस्था, युरोपियन महासंघ वा युरोपचा संघ व इतर बाबींचा ऊहापोह करण्यापूर्वी युरोपच्या संघाचा इतिहास पाहणे संयुक्तिक ठरेल. द्वितीय महायुद्धामुळे अमेरीका व रशिया (तत्कालीन सोव्हिएट संघ) वगळता ह्या महायुद्धात सामिल झालेले इतर देश व जगातील उर्वरीत देशांची अर्थव्यवस्था कोलमडली होती. युरोपमधील बलाढ्य सत्तांना म्हणजेच इंग्लंड व फ्रान्सला महायुद्धाचे जबर हादरे बसले होते. युरोप खंडात नैराश्याचे वारे वाहत होते. अशावेळी आर्थिक संकटात असलेला युरोप म्हणजे रशियाच्या साम्यवादाचा प्रसार करण्याच्या मनसुब्यांच्या दृष्टीने सुपीक जमीनी प्रमाणे आहे हे अमेरीकेने ताडले व दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपची आर्थिक पुनर्रचना व पुर्नर्ज्जीवन करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. रशियाच्या युरोपमध्ये साम्यवादाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांना खीळ बसण्यासाठी युरोपमधील राष्ट्रे पुन्हा एकदा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली पाहिजेत हे अमेरीकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रूमन यांनी ताडले. ट्रूमन यांनी या दृष्टीने अनेक आर्थिक अनुदान योजनादेखील जाहीर केल्या. दुसऱ्या महायुद्धादरम्यानच १९४३ साली युरोपियन राष्ट्रांसाठी संयुक्तराष्ट्र मदत व पुनवर्सन संस्था स्थापन करण्यात आली.

अमेरीकेचे तत्कालीन परराष्ट्र सचिव मार्शल यांनी १९४७ सालच्या जुलै महिन्यात फ्रान्सची राजधानी पॅरीस येथे सोळा देशांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन युरोपच्या आर्थिक पुनर्रचनेचा व पुर्नर्ज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेतला. १९४८ सालापर्यंत अमेरीकेने मार्शल योजनेअंतर्गत पश्चिम युरोपमधील देशांना कोट्यावधी डॉलर्सची मदत केलेली आढळते. मार्शल ह्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे ह्या योजनेला मार्शल योजना असे संबोधले गेले. मार्शल योजनेला अमेरीकेच्या क्राँग्रेसने (अमेरीकेच्या संसदेला 'काँग्रेस' असे संबोधल जाते व काँग्रेसची दोन दालने असून वरीष्ठ दालनास 'सिनेट' तर कनिष्ठ दालनास 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटीव्हज्' असे म्हटले जाते) मंजूरी दिल्यानंतर ३ एप्रिल १९४८ रोजी कायदा संमत झाला व युरोपला चार वर्षे आर्थिक सहाय्य देण्याचा प्रस्ताव करण्यात आला. त्यानुसार १९४८ ते १९५२ ह्या चार वर्षाच्या कालावधीसाठी अमेरीकेच्या काँग्रसने युरोपला व प्रामुख्याने पश्चिम युरोपला आर्थिक सहाय्य देण्यासाठी सुमारे १३ दशलक्ष डॉलर्सची तरतूद केलेली आपणास आढळते. सुरुवातीस अन्न पुरवठा, खत उत्पादन इत्यादी बाबींवर भर देण्यात आला तर काही कालावधीनंतर औद्योगिक प्रगती साध्य करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. मार्शल योजनेचा सर्वात जास्त लाभ पोहोचलेले देश म्हणजे ग्रेट ब्रिटन (युनायटेड किंगडम), फ्रान्स व पश्चिम जर्मनी हे देश होत. ब्रिटनमध्ये तर मार्शल योजनेमुळे झालेले आर्थिक बदल ठळकपणे दिसण्यास

सुरुवात झाली व ब्रिटनमध्ये जहाज बांधणी उद्योगात पश्चिम जर्मनीत कृषीक्षेत्रात मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल वा सुधारणा झालेल्या निदर्शनास येते. पश्चिम युरोपातील देशांना मार्शल योजनेचा सर्वात जास्त फायदा होऊन तेथील अर्थव्यवस्था लवकरच पूर्वपदावर आल्या. यात प्रामुख्याने ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व पश्चिम जर्मनी ह्या देशांचा समावेश होता.

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात अवघ्या वीस वर्षांच्या अंतराने पहिल्या महायुद्धानंतर दुसरे महायुद्ध झाल्यामुळे संपूर्ण जग ढवळून निघाले होते. ह्या दोन्ही युद्धांची झळ फार मोठ्या प्रमाणात युरोपातील देशांना बसलेली होती. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या विदारक अनुभवानंतर युरोपामधील सर्वच प्रमुख देशांना युरोपमध्ये शांतता प्रस्थापित होऊन ती दीर्घकाळ नांदावी असे वाटत होते व यासाठी युरोपमधील काही प्रमुख नेते कार्यरत देखील होते. युरोपने दुसऱ्या महायुद्धानंतर एकत्र येऊन प्रबळ व्हावे असे वाटण्यास वा अशी कल्पना पुढे येण्यास अनेक कारणे होती. सर्वात प्रथम तर, युरोपमध्ये भविष्यात युद्ध होऊ न द्यावयाचे असेल तर सर्वांनी एकत्र येऊन आर्थिक व राजकीय सहकार्याचे धोरण स्विकारण्याची गरज होती. युरोपातील काही नेत्यांना वाटत होते की, दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरीका व सोव्हिएट संघ ह्या दोन महासत्ता अस्तित्वात आलेल्या आहेत व युरोप एकत्र आला नाही तर युरोपमधील लहान देशांना ह्या दोन महासत्तांच्या मागे फरफडत जावे लागेल. अशा अवस्थेत युरोपची आर्थिक परिस्थिती खुंटू शकते वा म्हणावी त्या वेगाने होणार नाही अशी भीतीदेखील युरोपमधील अनेक देशांना वाटत होती. आपण युरोपचा मागच्या दोनशे-तीनशे वर्षांचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की, ह्या कालावधीत युरोपमध्ये अनेक युद्धे झालेली होती व त्या युद्धांचा युरोपवर व एकंदरीतच युरोपच्या अर्थकारणावर विपरीत परिणाम झालेला होता. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर अजून एक युद्ध नको या भावनेतून देखील युरोपीयन देशांनी एकत्र यावे या प्रकारची भावना बळावलेली दिसते. त्याचप्रमाणे पश्चिम युरोपातील ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इत्यादी देशांना दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाने चालवलेल्या साम्यवादाच्या प्रसाराच्या झपाट्याने भेडसावलेले होते. रशियाच्या ह्या साम्यवादाच्या प्रसार करण्याच्या कारवायांना खीळ बसविण्यासाठी देखील युरोपचे अनेक देश एकत्र येऊन आपसांतील सहकार्य वाढविण्यास उत्सुक होते. त्याचप्रमाणे अमेरीका व रशिया ह्या दोन महसत्तांच्या सत्ता संघर्षात युरोपला आपली ओळख व स्थान अबाधित ठेवण्यासाठी देखील एकत्र येणे आवश्यक होते. ब्रिटनचे पंतप्रधान विन्सटन चर्चिल (हे १९४० ते १९४५ व नंतर १९५१ ते १९५५ ह्या कालावधीत ग्रेट ब्रिटनचे वा युनायटेड किंगडमचे पंतप्रधान होते) हे देखील युरोपियन एकतेचे खरे समर्थक होते. चर्चिल यांनी १९४३ मध्ये युरोपची एक महासमिती असावी असे प्रतिपादन केले होते व यातूनच पुढे चालून युरोपमधील आर्थिक सहकार्याचा पाया रचला गेला होता.

१९४७ साली युरोपमध्ये एक महत्त्वाची घटना घडली व ही घटना म्हणजे युरोपियन आर्थिक परिषदेची स्थापना ही होय. ही संघटना स्थापन करण्यामध्ये ब्रिटनचे तत्कालीन परराष्ट्र सचिव अर्नेस्ट बेविना यांनी महत्त्वाची भुमिका बजावलेली होती. ह्या परिषदेच्या स्थापनेत अमेरीकेचा देखील मोठा वाटा होता. युरोपियन आर्थिक परिषदेच्या माध्यमातून अवघ्या सहा वर्षांच्या कालावधीत व्यापार क्षमतेत दुप्पट वाढ झाली होती.

सध्याच्या युरोपियन संघाच्या वा युरोपियन युनियनच्या स्थापनेची सुरुवात खऱ्या अर्थाने युरोपचा आर्थिक समुदाय वा युरोपियन आर्थिक समुदाय ह्या संस्थेच्या स्थापनेपासून झालेली आढळते. युरोपियन आर्थिक समुदायाच्या स्थापनेचे देखील विविध टप्पे आहेत. १९४४ साली दुसऱ्या महायुद्धा दरम्यान नाझी

जर्मनीने बेल्जियम, नेदरलँड व लक्झेमबोर्ग ह्या देशांवर कब्जा केल्यानंतर ह्या देशांच्या प्रतिनिधींनी लंडन येथे भविष्यात परस्पर सहकार्याचा आराखडा बनवला. ह्याला बेनेलक्स करार (Benelux) म्हणून संबोधले गेले. १९५१ सालच्या पॅरीसच्या तहानुसार १९५२ साली युरोपच्या कोळसा व पोलाद (लोह)(European Coal and Steel Community) संघाची वा समुदायाची स्थापना झाली. ह्या संघटनेची स्थापना करण्यात फ्रान्सचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री रॉबर्ट शूमन यांनी पुढाकार घेतला होता. फ्रान्स व जर्मनीच्या स्पर्धेत पहिल्या महायुद्धाची व दुसऱ्या महायुद्धाची मुळे वा बीजे असलेली आपणास दिसतात. त्यामुळे युरोपमधील लोखंड व कोळशाचे साठे संपूर्ण युरोपच्या अधिपत्याखाली आणल्यास त्याचा फायदा सर्व देश घेऊ शकतील ह्या भावनेतून युरोपच्या कोळसा व पोलाद समुदायाची संकल्पना पुढे आली वा प्रस्ताव मांडण्यात आला. ह्या समुदायात वा संघात बेनेलक्स करारावर सह्या करणारे बेल्जियम, नेदरलँड व लक्झेमबोर्ग हे देश सहभागी झाले त्याचप्रमाणे पश्चिम जर्मनी, फ्रान्स व इटली हे देशदेखील सहभागी झाले. मात्र, ब्रिटनने युरोपच्या कोळसा व पोलाद समुदायापासून दूर राहणे पसंत केले. ह्यामागचे कारण म्हणजे ब्रिटनला अशी आशंका होती की, ब्रिटन जर ह्या समुदायात सहभागी झाला तर त्याच्या स्वतंत्र आर्थिक घोरणांना बाधा येईल. युरोपच्या कोळसा व पोलाद संघाच्या स्थापनेनंतर युरोपमध्ये आर्थिक सहकार्याच्या धोरणाचा प्रसार व्हावा व देशादेशांमधील व्यापारविषयक निर्बंध व अडसरे दूर करावेत अशा प्रकारचा विचार पसरु लागला व प्रबळ होऊ लागला. १९५४ साली ह्या समुदायातील देशांनी देखील ह्या संघाचा विस्तार व्हावा अशी मागणी केली. या मागणीला प्रतिसाद म्हणून ह्या समुदायाच्या सभासद राष्ट्रांच्या सहा प्रतिनिधींची सिसीली मधील मेसिना (इटली) येथे बैठक झाली व आर्थिक सहकार्याची एक योजना आखण्यात आली व बेल्जियमचे परराष्ट्रमंत्री स्पाक यांच्या अध्यक्षतेखाली आराखडा तयार करण्यात आला व रोम (इटली ह्या देशाची राजधानी) येथे १९५७ च्या मार्च महिन्यात युरोपच्या (युरोपियन) आर्थिक समुदायाची (European Economic Community) स्थापना करण्यात आली. युरोपच्या आर्थिक समुदायाचे युरोपमध्ये सामुहिक बाजारपेठ निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते. ह्या समुदयामध्ये सुरुवातीला फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इटली, बेल्जियम, नेदरलँड व लक्झेमबोर्ग हे सहा देश सहभागी झाले होते. युरोपच्या आर्थिक समुदायासोबतच ह्या काळात युरोपियन आण्विक समुदायाची स्थापना झालेली देखील आपणास आढळते. युरोपच्या आर्थिक समुदायात सहभागी झालेल्या ह्या सहा देशांनी परस्परांमधील व्यापारविषयक निर्बंध काढून टाकण्यास मान्यता दिली व देशातील कामगारांचे राहणीमान उंचावणाऱ्या योजना राबविण्याचेही मान्य केले.

युरोपच्या समुदायाची दैनंदिन कामे पार पाडण्यासाठी युरोपियन कमिशनची स्थापना करण्यात आली. युरोपियन कमिशनचे मुख्यालय ब्रसेल्स (Brussels) ह्या शहरात होते. ब्रसेल्स ही बेल्जियम या देशाची राजधानी होय. युरोपच्या आर्थिक समुदायातील विविध देशांच्या आर्थिक योजनांच्या माहितीच्या देवाणघेवाणीसाठी सभासद देशांच्या प्रतिनिधींची एक महासमिती स्थापन केली गेली. त्याचप्रमाणे युरोपियन समुदायातील सहभागी देशांनी निवडलेल्या प्रतिनिधींची युरोपियन संसद स्थापन करण्यात आली. ह्या समुदायातील देशांमधील तंटे सोडविण्यासाठी युरोपियन न्यायालयाची देखील स्थापना करण्यात आली. ह्या युरोपच्या न्यायालयाची स्थापना रोम येथे संमत झालेल्या करारानुसार करण्यात आली. युरोपचा आर्थिक समुदाय म्हणजे युरोपच्या आर्थिक, सामाजिक व काही अशी राजकीय क्षेत्रातील सहकार्याचे एक नवे पर्व होते.

ग्रेट ब्रिटनची या सर्व घडामोडींबाबत काय भूमिका

होती हे जाणून घेणे फार महत्वाचे आहे. हा देश युरोपचा अविभाज्य घटक तर आहेच मात्र, ह्या देशाने फार पूर्वीपासून युरोपच्या व जगाच्या राजकारणात व अर्थकारणात देखील फार मोठी भूमिका बजावलेली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमधील देशांनी अशाप्रकारे एकत्र यावे व त्यातूनच त्यांची खऱ्या अर्थाने प्रगती होऊ शकते अशा आशयाचे मत ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी मांडले होते. असे असताना देखील ब्रिटनने युरोपच्या आर्थिक समुदायापासून दूर राहणे पसंत केले. ही बाब निश्चितपणे सर्वांना आश्चर्यात टाकणारी होती. ब्रिटनने असे का केले असावे ह्या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला पुढील उत्तरे सापडतात. ग्रेट ब्रिटन व अमेरीका यांचे पूर्वापार पासून अतिशय घनिष्ट मैत्रीचे संबंध होते. ब्रिटनला अशी भीती वाटत होती की, ब्रिटन युरोपच्या आर्थिक समुदायात सामील झाला व युरोपमधील इतर देशांच्या अधिक जवळ गेला तर कदाचित अमेरिकेला ते रुचणार नाही. अमेरीकेला अगोदरच सोव्हिएत संघाच्या रुपाने स्पर्धक होता व एकत्रित आलेला युरोप खंड निश्चितपणे अमेरीकेचा अजून एक नवीन स्पर्धक ठरला असता. त्यामुळेच अमेरीकेची मर्जी राखण्यासाठी ब्रिटनने युरोपच्या आर्थिक समुदायापासून दूर राहण्याचे ठरवलेले दिसते. ग्रेट ब्रिटनचे जगातील अनेक देशांसोबत चांगले संबंध होते व दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनच्या अधिपत्याखाली असणाऱ्या अनेक वसाहती (देश) स्वतंत्र झाले. याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे आपला भारत देश होय. भारतावर ब्रिटीशांनी शेकडो वर्षे राज्य केले. ब्रिटीशांनी भारत काबीज करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात खऱ्या अर्थाने १७५७च्या प्लासीच्या लढाईपासून केली व त्यानंतर १८५७ पर्यंत ही प्रक्रीया चालूच होती. विविध गव्हर्नर जनरल्सनीं वेगवेगळी धोरणे व युक्त्या लढवून भारतातील विविध प्रांत ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आणले. अशा गव्हर्नर जनरल्सपैकी लॉर्ड कॉर्नवॉलीस, लॉर्ड वेलस्ली व लॉर्ड डलहौसी यांची नावे आवर्जून घ्यावी लागतील. लॉर्ड कॉर्नवालीस हा अमेरीकेच्या स्वातंत्र्य युद्धादरम्यान ब्रिटीश सैन्याचे अमेरीकन सैन्याच्या विरोधात नेतृत्व करत होता. त्याला अमेरीकेत पराभवाला सामोरे जावे लागले व अमेरीका ब्रिटनच्या राजवटीतून मुक्त वा स्वतंत्र झाली. ह्या लॉर्ड कॉर्नवालीसला नंतरच्या काळात भारतात धाडण्यात आले व तो भारतात कमालीचा यशस्वी ठरला. त्याने दक्षिण भारतातील टिपू सुलतान ह्या राजाचा पराभव करून सध्याच्या दक्षिण कर्नाटकातील बराचसा भाग ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आणला. लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौज पद्धतीचा वापर करून भारतातील राजांना खिळखिळे करून टाकले व लॉर्ड डलहौसीने युद्धनीतिच्या व दत्तक खालसा नामंजूर धोरणाच्या सहाय्याने भारतातील अनेक राज्य काबीज केली. ब्रिटीशांच्या भारतातील ह्या साम्राज्यवादी धोरणांविरोधात १८५७ साली मोठा उठाव झाला व १८५८ सालापासून ब्रिटनच्या सम्राज्ञीच्या जाहीरनाम्यानुसार त्यांनी भारतातील प्रदेश काबीज करण्याचे धोरण सोडून दिले. ह्या घटनेनंतर भारतातील ब्रिटीश ईस्ट कंपनीची सत्ता संपुष्टात आली व भारतावर ब्रिटीश सरकारचा अंमल खऱ्या अर्थाने सुरु झाला. भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून राष्ट्रीय चळवळीची सुरुवात झाली व १९४७ साली १५ ऑगस्ट या दिवशी भारताला ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. असो, भारताप्रमाणे ब्रिटनच्या आशिया व आफ्रिका खंडातील इतर अनेक वसाहतींमध्ये अशाच प्रकारच्या स्वातंत्र्य चळवळी झाल्या व ते देश स्वतंत्र झाले. एका अर्थाने ब्रिटनच्या साम्राज्याचा सुर्यास्त होण्यास सुरुवात झाली. अशा दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या व पूर्वाश्रमीच्या ब्रिटनची वसाहत असलेल्या देशांबरोबर ब्रिटनने सौदाहार्याचे व चांगले संबंध ठेवण्याचे धोरण अवलंबिले. यातूनच 'ब्रिटीश कॉमनवेल्थ' ह्या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झालेली होती. ह्या संघटनेतील बरेचसे देश पूर्वी ब्रिटनच्या

अधिपत्याखाली होते. 'ब्रिटीश कॉमवेल्थ' ह्या संघटनेच्या सदस्य देशांसोबत ब्रिटनचे आर्थिक संबंध होते. भारत देखील ह्या संघटनेचा सदस्य होता. युरोपच्या आर्थिक समुदायात सामील झाल्यावर ब्रिटनच्या 'ब्रिटीश कॉमनवेल्थ' ह्या संघटनेतील देशांसोबतच्या संबंधावर त्याचा परिणाम होईल व त्यांच्याशी असलेल्या व्यापारविषयक धोरणांना बाधा होईल अशी भीतीदेखील ग्रेट ब्रिटनला वाटत होती. ग्रेट ब्रिटनचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की, ह्या देशाने पूर्वीपासून युरोपमध्ये आपली एक वेगळी ओळख ठेवलेली आहे व आपले स्वतंत्र राजकीय व आर्थिक धोरण राबविलेले आहे. युरोपच्या आर्थिक समुदायात सामील झाल्यावर ब्रिटन आपली खरी ओळख हरवून बसेल व त्या देशाचा युरोपवर असलेला वरचष्मा व प्रभुत्व कमी होईल असे ब्रिटनच्या काही धुरिणांना वाटत होते. त्यामुळे देखील ब्रिटनने युरोपच्या आर्थिक समुदायाकडे पाठ फिरवलेली दिसते.

ग्रेट ब्रिटनला नंतरच्या काळात आपण युरोपपासून दूर चाललो आहोत अशी जाणीव झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे ब्रिटनने युरोपमधील आपले स्थान अबाधित राहावे व युरोपमधील इतर देशांशी व्यापार विषयक संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून युरोपियन मुक्त व्यापार संघटनेची स्थापना केलेली आढळते. ह्या संघटनेत डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, स्वित्झर्लंड व ऑस्ट्रिया हे देश सहभागी झाले. या संघटनेचे वैशिष्ट्य म्हणजे सदस्य राष्ट्र एकमेकांच्या आर्थिक धोरणात हस्तक्षेप करु शकत नव्हते. ग्रेट ब्रिटनला हळूहळू उमगले की, युरोपच्या आर्थिक समुदायात सामील झालेल्या देशांमधील परस्पर व्यापारी संबंध वृद्धिंगत होत आहेत व त्याचा त्या सर्व देशांना फायदा होत आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर १९६१ सालापर्यंत म्हणजेच युरोपियन आर्थिक समुदायाच्या स्थापनेच्या नंतर फ्रान्स व पश्चिम जर्मनी यांच्या उत्पादन क्षमतेत कमालीची वाढ झाली होती. ह्या काळात इंग्लंडची अर्थव्यवस्था काहीशा बिकट अवस्थेतून चालली होती. ब्रिटन प्रणीत युरोपियन मुक्त व्यापार संघटना, युरोपच्या आर्थिक समुदायाएवढी यशस्वी होऊ शकली नव्हती. ग्रेट ब्रिटनला हे सुद्धा उमगले होते की, युरोपमधील बहुतेक राष्ट्र आर्थिक व राजकीयदृष्ट्या जवळ येत असताना ब्रिटनला अलिप्त राहणे वा वेगळे राहणे परवडणारे नाही. त्यामुळेच १९६१ साली ब्रिटनचे पंतप्रधान हेरॉल्ड मॅकमिलन यांनी युरोपच्या आर्थिक समुदायात सहभागी होण्याची इच्छा प्रकट केली होती.

हेरॉल्ड मॅकमिलन यांच्या इच्छेनुसार ब्रिटनला युरोपियन आर्थिक समुदायात सहभागी होण्याबाबत सुरु असलेल्या चर्चेत फ्रान्सचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जनरल गॉल यांनी रस दाखवला नाही. उलट त्यांनी ब्रिटनच्या युरोपच्या आर्थिक समुदायातील प्रवेशाला तीव्र हरकत घेतली. ब्रिटनचे आर्थिक हिसंबंध दुसरीकडे गुंतलेले असून त्यांच्या अर्थव्यवस्थेतील समस्यांचा युरोपच्या आर्थिक समुदायातील सभासद राष्ट्रांवर परिणाम होऊ शकतो. ह्या सबबीखाली गॉल यांनी ब्रिटनच्या प्रवेशाला हरकत घेतली. परंतु खरे पाहता युरोपच्या आर्थिक समुदायावर फ्रान्सचा प्रभाव व वर्चस्व होते. त्यामुळे ग्रेट ब्रिटनचा ह्या समुदायात प्रवेश झाला तर आपले महत्व कमी होईल असे देखील फ्रान्सला वाटत होते. गॉल यांची ब्रिटनकडे बघण्याची दृष्टी केवळ सभासद राष्ट्र ही नसून आपल्याशी स्पर्धा करणारे राष्ट्र ही होती. तसेच ग्रेट ब्रिटनशिवाय देखील युरोपच्या आर्थिक समुदायाने चांगली आर्थिक प्रगती साध्य केली होती. त्यामुळे फ्रान्स, ग्रेट ब्रिटनच्या युरोपीयन आर्थिक समुदायातील प्रवेशासाठी उत्सुक नव्हता. अखेर १ जानेवारी १९७३ मध्ये ब्रिटनने, आयर्लंड व डेन्मार्क ह्या देशांसह युरोपच्या आर्थिक समुदायात प्रवेश मिळवला. १९८६ मध्ये स्पेन, पोर्तुगाल व ग्रीस हे देश देखील सहभागी झाले.

भरलेला खिसा माणसाला दुनिया दाखवतो, रिकामा खिसा मात्र दुनियेतील माणसं दाखवतो.

युरोपच्या आर्थिक समुदायास कालांतराने युरोपचा समुदाय (European Union) असे संबोधण्यात येऊ लागले. मराठीत या संघटनेस युरोपचा संघ वा युरोपियन संघ असे म्हणण्यास देखील हरकत नाही. १९९२ साली युरोपच्या समुदायातील बारा सदस्यांनी युरोपियन संघाबाबतचा (European Union) करार केला. हा करार नेदरलँडमधील मॅसट्रीक्ट (Maastricht) ह्या शहरामध्ये झाल्यामुळे त्यास मॅसट्रीक्टचा करार (Maastricht Treaty) असे देखील म्हटले जाते. ह्या करारानुसार १ जानेवारी १९९४ पासून युरोपचा समुदाय, युरोपियन संघ वा युरोपयिन युनियन (European Union) ह्या नावाने ओळखला जाऊ लागला. ह्याच करारानुसार युरोपच्या मध्यवर्ती बँकेची (European Central Bank) स्थापना करण्याचे ठरले व १९९८ साली ही बँक कार्यरत झाली. मॅसट्रीक्टच्या करारानुसारच युरोपच्या संघातील देशांनी समान चलनाचा स्विकार करावा असे ठरविण्यात आले होते. ह्याचीच परिणती वा परिणाम म्हणून 'युरो' हे चलन अस्तित्वात आले व १९९९ मध्ये ऑस्ट्रीया, बेल्जियम, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, आयर्लंड, इटली, लक्झेमबोर्ग, नेदरलँड, पोर्तुगाल व स्पेन अशा अकरा देशांनी 'युरो' ह्या चलनाचा स्विकार केला. २००२ साली दक्षिण-पूर्व युरोपातील ग्रीस ह्या देशाने देखील 'युरो' ह्या चलनाचा स्विकार केला. २००४ साली सायप्रस, झेक प्रजासत्ताक, इस्टोनिया, हंगेरी, लॅटव्हिया, लिथुआनिया, मॉल्टा, पोलंड, स्लोव्हाकिया व स्लोव्हेनिया ह्या दहा देशांनी युरोपियन संघात प्रवेश केला. २००५ साली युरोपियन संघाने पूर्व युरोपातील बल्गेरिया व रोमानिया ह्या देशांना युरोपियन संघात सामील होण्याचे आमंत्रण दिले.

अशा तऱ्हेने युरोपियन संघातील देशांची संख्या वेळोवेळी वाढलेली दिसते. युरोपियन संघाने जगातील सर्वात जास्त देश एकत्र असलेला आर्थिक समुदाय म्हणून नावलौकिक कमावलेला आहे. १९९१ साली सोव्हिएट संघाच्या विघटनानंतर अनेक देश अस्तित्वात आले. ह्यापैकी रशिया हा देश क्षेत्रफळाने सर्वात मोठा आहे व त्याची राजधानी 'मॉस्को' हे शहर आहे. पूर्वीच्या सोव्हिएट संघात इतर प्रांतांवर म्हणजेच आता स्वतंत्र झालेल्या देशांवर प्रामुख्याने ह्या रशियाचेच प्रभुत्व होते व सोव्हिएट संघाची राजधानीसुद्धा 'मॉस्को' हे शहरच होते. सोव्हिएट संघातून बाहेर पडलेले इस्टोनिया, लिथुआनिया, लॅटव्हिया इत्यादी देश मात्र युरोपच्या संघात सामील झालेले आढळतात.

'ब्रेक्झीट'चे परिणाम संपूर्ण जगावर तर होतीलच मात्र, युनायटेड किंगडम मध्ये देखील त्याचे मोठ्या प्रमाणात पडसाद उमटतील असे तज्ज्ञांचे मत आहे. आपण अगोदर पाहिल्याप्रमाणे युनायटेड किंगडममध्ये विविध प्रांतांमध्ये अंतर्गत वाद आहेत. प्रामुख्याने उत्तर आयर्लंड व स्कॉटलंडमध्ये ब्रिटनमधून बाहेर पडण्याची प्रवृत्ती अगोदरपासूनच दिसते. त्यामुळे हे दोन प्रांत युनायटेड किंगडम मधून बाहेर पडण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. एवढेच नव्हे तर जर्मनी, फ्रान्स व नेदरलँड ह्या युरोपियन देशांमध्ये देखील युरोपियन संघातून बाहेर पडावे असे म्हणणाऱ्या उजव्या विचारसरणीच्या लोकांची व राजकारण्यांची संख्या नाही म्हटले तरी बऱ्यापैकी आहे. ह्या देशांमधील उजव्यांचे देखील त्यांच्या देशांनी युरोपच्या संघातून बाहेर पडावे असे मत आहे. 'ब्रेक्झीट' नंतर ह्या भावना अजून बळावतील व हे देशदेखील युरोपच्या संघातून बाहेर पडण्यासाठी होणाऱ्या चळवळी नजीकच्या काळात अनुभवातील असे काही राजकीय विश्लेषक म्हणतात.

सद्यस्थितीत अमेरीकेची मात्र विचित्र अवस्था झालेली आढळते. 'ब्रेक्झीट'चा अमेरीकेच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून अमेरीकेची मध्यवर्ती बँक, 'फेड'ने (पूर्ण नाव-फेडरल रिझर्व्ह सिस्टम-ही भारताच्या रिझर्व्ह बँकेप्रमाणे अमेरीकेची मध्यवर्ती बँक असून हिचे कार्य रिझर्व्ह

सर्वात जास्त जन्माला येणारी आणि मृत्यू पावणारी गोष्ट म्हणजे विश्वास.

बँकेप्रमाणेच अर्थव्यवस्थेवर लक्ष ठेवून लागलीच व वेळेत वित्तविषयक व इतर महत्वाचे निर्णय घेण्याचे आहे) व्याज दरांमध्ये वृद्धी न करता बाजी मारुन नेली आहे. मात्र, येणाऱ्या काळात अमेरीकेला 'ब्रेक्झीट'चा चटका निश्चित लागेल असे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. याचे कारण म्हणजे युरोपियन संघासमोर आपले आर्थिक निर्णय, जागतिक अर्थविषयक मते त्याचप्रमाणे राजकीय मते मांडण्यासाठी अमेरीकेला युनायटेड किंगडम वा ब्रिटन हा अतिशय उत्तम व योग्य पर्याय वा माध्यम होते. असे होणे शक्य होते कारण अमेरीका (अमेरीकेची संयुक्त संस्थाने) व युनायटेड किंगडम गेल्या अनेक दशकांपासून अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र आहेत. आजपर्यंत युनायटेड किंगडमने आंतरराष्ट्रीय राजकारणात व अर्थकारणात अमेरीकेच्या बाजूचीच भूमिका घेतलेली दिसते. एवढेच नव्हे, तर अमेरीका आपल्या अत्यंत निकटच्या मित्रांपैकी युनायटेड किंगडम हा एक देश आहे असे मानतो. किंबहुना युनायटेड किंगडम हा अमेरीकेचा सर्वात जिव्हाळ्याचा मित्र आहे असे म्हणणे देखील अतिशयोक्ती ठरु नये. आपण विसाव्या शतकातील पहिल्या महायुद्धापासून ते आजपर्यंतचा इतिहास पहिला तर लक्षात येईल की, ह्या दोन देशांमध्ये अपवादानेच एखाद्या मुद्यावरुन वाद झाले असतील. अमेरीकेने विविध आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत आपले मत मांडावे व भूमिका घ्यावी व युनायटेड किंगडमने त्यास आपसूकच पाठिंबा व दुजोरा द्यावा अशा अनेक घटना आपल्याला आढळतील. २० व्या शतकातील शेवटच्या दशकात झालेले पहिले इराक युद्ध, २१ व्या शतकाच्या सुरुवातीस अमेरीकेवर ९/११ चे दहशतवादी हल्ले झाल्यानंतर अमेरीकेने आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरुद्ध पुकारलेले (जाहिर केलेले) युद्ध, या पाठोपाठ इराकविरुद्ध केलेले दुसरे युद्ध व सद्दाम हुसेनचा खातमा, अमेरीकेने अफगाणिस्तानावर केलेले हल्ले व ९/११ चा प्रमुख म्होरक्या ओसामा-बिन-लादेनला ठार करण्याचा बांधलेला चंग ह्या सर्व घटना पाहिल्या तर लक्षात येते की, युनायटेड किंगडम हा अमेरीकेच्या मागे सावली सारखा उभा राहिलेला होता.

२००३ मध्ये इराकवर हल्ला करताना तर संयुक्त राष्ट्र संघटनेसारखी आंतरराष्ट्रीय संघटना देखील अमेरिकेच्या ह्या मताशी सहमत नव्हती. त्यावेळी अमेरीकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बूश ज्यूनियर ह्यांनी तर अमेरीका, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पाठिंब्या शिवाय देखील इराकवर हल्ला करील अशी गर्जना केली होती. त्यावेळी फ्रान्स सारख्या प्रबळ देशाने देखील अमेरीकेच्या ह्या मनसुब्याविरुद्ध नाराजी व्यक्त केली होती. मात्र, युनायटेड किंगडम अशाही स्थितीत अमेरीकेच्या मागे ठाम उभा राहिला होता. इराककडे कशाप्रकारे मोठ्या प्रमाणात विध्वंसक शस्त्रास्त्रे (Weapons of Mass Destruction) आहेत व इराकचा शासक सद्दाम हुसेन हा कशाप्रकारे जागतिक शांततेला मोठा धोका आहे, हे सांगण्याची जणू जॉर्ज डब्ल्यू बूश ज्यूनियर व युनायटेड किंगडमचे तत्कालीन पंतप्रधान टोनी ब्लेअर यांच्यात चढाओढ लागली होती. अमेरीकेत जॉर्ज डब्ल्यू बूश यांनी एखादे मत मांडले की, तेच मत टोनी ब्लेअर ठासून युरोपात मांडत असत. अशाप्रकारे, आंतरराष्ट्रीय राजकारणात व अर्थकारणात युनायटेड किंगडम हा अमेरीकेचा फार मोठा पाठीराखा व आधारस्तंभ होता व आहे. त्यामुळेच युनायटेड किंगडम युरोपच्या संघातून बाहेर पडल्यामुळे अमेरीकेची ह्या संघात मते मांडण्याची बाजू दुबळी पडणार आहे. ह्या सर्व घडामोडींमध्ये अमेरीका व फ्रान्स यांच्यामधील संबंधदेखील पूर्वीसारखे जास्त सौख्याचे राहिलेले नाहीत. तसे पाहता सुरुवातीपासूनच म्हणजे अगदी २० व्या शतकापासूनच फ्रान्सला अमेरीका व सोव्हिएत संघ या दोन महासत्तांचे निर्विवाद वर्चस्व मान्य नव्हते. अमेरीकेने अगोदर नमूद केल्याप्रमाणे सद्दाम हुसेन विरुद्ध दुसऱ्या इराक युद्धाची जेव्हा मोर्चे बांधणीस सुरुवात केली

जिंकणे म्हणजे नेहमी फक्त पहिला येणे, असे नसते. एखादी गोष्ट पूर्वीपेक्षा जास्त चांगली करणे म्हणजेच जिंकणे होय. - विल्यम शेक्स्पिअर

होती तेव्हा फ्रान्सचा अमेरीकेला पाठिंबा नव्हता. अमेरीकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जनरल कॉलीन पॉवेल यांनी तर फ्रान्सची जाहीर चेष्टा केली होती. एवढेच नव्हे तर अमेरीकेतील पुढारी मंडळींनी व प्रसारमाध्यमांनी त्यावेळी फ्रेंच लोकांना हिणवण्यासाठी वापरला जाणारा 'Cheese-eating Surrender Monkeys' हा इंग्रजी वाक्यप्रचारदेखील वापरला होता. फ्रान्स हा देश दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळापासून युरोपियन ऐक्याचा व युरोपियन संघाचा फार मोठा पाठिराखा राहिलेला आहे. त्याचप्रमाणे युनायटेड किंगडम व फ्रान्स ह्या दोन देशांमध्ये फार पूर्वीपासून (शेकडो वर्षांपासून) ऐतिहासिक स्पर्धा असल्याचे दिसते. १८ व्या व १९ व्या शतकातील महान फ्रेंच सम्राट नेपोलियन याने जवळ जवळ संपूर्ण युरोप पादाक्रांत केला होता. मात्र त्याला ग्रेट ब्रिटन जिंकता आले नव्हते. नेपोलियन तर ग्रेट ब्रिटनचा उल्लेख 'दुकानदारांचा देश' म्हणून करायचा व ब्रिटीश लोकांना हिणवायचा. ब्रिटन व फ्रान्समधील ही स्पर्धा २० व्या शतकात देखील चालू असलेली दिसते व सद्यस्थितीत म्हणजेच २१ व्या शतकात देखील ह्या दोन देशांमधील सुप्त स्पर्धा विविध आंतरराष्ट्रीय घटनांतून आपल्या निदर्शनास येते.

ब्रिटनच्या 'ब्रेक्झीट'च्या निर्णयामुळे गेली ६० वर्षे अबाधित असलेले युरोपिय संघाचे ऐक्य धोक्यात आले आहे. ह्या घटनेमुळे युनायटेड किंगडम मधील राजकारण पूर्णपणे ढवळून निघाले आहे. युनायटेड किंगडमचे 'ब्रेक्झीट' कौल जाहीर झाला त्यावेळचे माजी पंतप्रधान डेव्हीड कॅमरॉन हे हुजुर पक्षाचे नेते असून ते युनायटेड किंगडमने युरोपीयन संघात राहावे या मताचे कट्टर समर्थक होते. त्यामुळे ब्रिटनमधील जनतेने दिलेला 'ब्रेक्झीट'चा कौल म्हणजे डेव्हिड कॅमरॉन यांना वैयक्तिक धक्का तर आहेच मात्र हा त्यांच्या नेतृत्वाचा देखील पराभव झाला आहे असे चित्र निर्माण झाले आहे. किंबहुना त्यामुळेच कॅमरॉन यांनी आपल्या पंतप्रधान पदाचा राजीनामा देण्याचे ठरवले असावे.

अगोदर नमूद केलेले मजूर पक्षाचे ब्रिटनचे पंतप्रधान टोनी ब्लेअर व हुजुर पक्षाचे डेव्हिड कॅमरॉन ह्या दोघांचे वैशिष्ट्य व दोहोंमधील साम्य म्हणजे हे दोन्ही नेते आपापल्या काळात अतिशय तरुण असताना पंतप्रधान झाले त्याचप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय रुबाबदार व उमदे असून दोघेही उत्तम वक्ते आहेत. टोनी ब्लेअर यांनी दुसऱ्या इराक युद्धाच्या वेळी ज्याप्रकारे आवेशपूर्ण भाषणे केली होती व ब्रिटनच्या जनतेला व संसदेला आपले मत पटवून देण्याचा प्रयत्न केला होता अगदी त्याचप्रकारे डेव्हीड कॅमरॉन यांनी देखील युनायटेड किंगडमने युरोपीयन संघात राहावे यासाठी जीवाचे रान केले होते. मात्र, कॅमरॉन यांच्या ह्या प्रयत्नांना यश येऊ शकले नाही.

'ब्रेक्झीट'चा निकाल लागल्यानंतर जगातील वित्तीय बाजार व शेअर बाजार कोसळले तर पौंडची दहा टक्क्यांनी घसरण झाली. स्टर्लींग पौंड हे युनायटेड किंगडमचे चलन आहे. पौंडची १९८५ पासून झालेली ही सर्वात मोठी वा जास्त घसरण होती असे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. डेव्हीड कॅमरॉन यांच्यानंतर बोरीस जॉनसन यांचे नाव पंतप्रधान पदाचे दावेदार म्हणून घेतले जात होते. हे बोरीस जॉनसन म्हणजे युनायटेड किंगडमची राजधानी असलेल्या लंडन ह्या शहराचे माजी महापौर होत. बोरीस जॉनसन हे युनायटेड किंगडमने युरोपीयन संघातून बाहेर पडावे ह्या मताचे खंदे समर्थक होते. त्यांनी याबाबतीत युनायटेड किंगमडमच्या संसदेत देखील आपले मत मांडलेले होते.

ह्या जनमताचा कौल वर नमूद केल्याप्रमाणे युनायटेड किंगडमचे ऐक्य निश्चितपणे धोक्यात आणणारा आहे व ह्या देशाला येणाऱ्या काळात अंतर्गत वादांना मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागेल यात वाद नाही. सदर जनमत कौलादरम्यान मतदानाचा तपशील जर पाहिला तर आपल्या ह्या मताला दुजोरा मिळतो. स्कॉटलंड मधील

जनतेने युरोपियन संघात राहण्याच्या बाजूने कौल दिला आहे तर इंग्लंडमधील जनतेने 'ब्रेक्झीट'चा कौल दिला आहे. इंगलंडमधील लोकसंख्या इतर प्रांतांच्या मानाने जास्त असल्याने एकंदरीतच मतदानावर त्याचा परिणाम झालेला आढळतो. इंग्लंडसोबतच वेल्स ह्या प्रांताने देखील बहुमताने 'ब्रेक्झीट'च्या बाजूने कौल दिला आहे. मात्र, स्कॉटलंड व उत्तर आयर्लंड या दोन प्रांतांनी युरोपीयन संघात राहण्याच्या बाजूने मतदान केल्याचे निदर्शनास येते. स्कॉटलंडच्या प्रथम मंत्री (First Minister) निकोला स्टर्जन (Nicola Sturgeon) यांनी केलेले वक्तव्य म्हणजे युनायटेड किंगडम मध्ये येऊ घातलेल्या राजकीय डोकेदुखीचे सुतोवाच आहे. त्या म्हणाल्या आहेत की, स्टॉटलंडची युरोपियन संघात राहण्याची इच्छा असून त्या स्कॉटलंडच्या जनतेचा हा अभिप्राय युरोपियन कमीशन व युरोपीयन संघाच्या सदस्य असलेल्या इतर युरोपीयन देशांना कळविणार आहेत. एवढचे नव्हे, तर त्यांनी स्कॉटलंडमध्ये पुन्हा एकदा स्कॉटलंडने युनायटेड किंगडमध्ये राहायचे की नाही या विषयावर जनमत कौल घेतला पाहिजे असे मतप्रदर्शन केले आहे. जर असा जनमत कौल स्कॉटलंडमध्ये घेण्यात आलाच व स्कॉटलंडच्या जनतेने युनायटेड किंगडम मधून बाहेर पडण्याचा कौल दिला तर निश्चितच ह्या देशाचे विघटन होईल व स्कॉटलंड हा एक नवीन देश अस्तित्वात येईल. नियतीचा खेळ अजब आहे. ज्या ब्रिटनने १९ व्या व २० व्या शतकात जगभरात 'फोडा व झोडा' (Divide and Rule) या तत्त्वाचा वापर करून जगातील सर्वात मोठ्या साम्राज्यावर राज्य केले. आज त्याच युनायटेड किंगडमवर आपले राजकीय ऐक्य टिकवण्याचा कठीण प्रसंग आला आहे. भारतातील अनेक इतिहासकारांचे तर ठाम मत आहे की, ब्रिटीशांच्या धोरणांमुळे व त्यांनी घातलेल्या खतपाण्यामुळेच १९४७ साली भारताची फाळणी झाली व भारतापासून वेगळे होऊन पाकिस्तान हा एक नवीन देश अस्तित्वात आला. असो, ह्या ठिकाणी याविषयावर जास्त लिहिणे संयुक्तीक ठरणार नाही. ग्रेट ब्रिटनची वा युनायटेड किंगडमची राजकीय नेते मंडळी २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत अभिमानाने सांगायची की, ब्रिटीश साम्राज्यावर कधीच 'सूर्यास्त' होत नाही. आज त्याच ब्रिटनवर अतिशय दयनीय वेळ आलेली दिसते.

काहीही असले तरी एक गोष्ट मान्य करावीच लागेल की, जगामध्ये शांतता टिकवून ठेवण्यासाठी व स्थैर्य राखण्याठी युनायटेड किंगडमसारखा देश प्रबळ असण्याची गरज आहे. जशी युनायटेड किंगडमला आपले राजकीय ऐक्य टिकविण्यासाठी धडपड करावी लागणार आहे अगदी त्याचप्रमाणे युरोपच्या संघाला देखील हा संघ टिकवून ठेवण्यासाठी भगीरथ प्रयत्न करावे लागणार आहेत. याचे कारण म्हणजे, अगोदर नमूद केल्याप्रमाणे फ्रान्स व नेदरलँडसारख्या (नेदरलँड ह्या देशाला 'हॉलंड' म्हणून देखील ओळखले जाते) देशांमध्ये देखील युरोपीयन संघातून बाहेर पडावे असे म्हणणाऱ्यांचा एक गट वा समूह आहे. फ्रान्समधील फ्रेंच नॅशनल फ्रंट या पक्षाच्या मरीन ले पेन (Marine Le Pen) ह्यांनी 'ब्रेक्झीट' च्या निकालाचे स्वातंत्र्याचा विजय (Victory for freedom) ह्या शब्दांत स्वागत केले आहे. यापुढे जाऊन त्यांनी म्हटले आहे की, अशाच प्रकारचा जनमत कौल फ्रान्ससह युरोपमधील दुसऱ्या देशांमध्ये देखील घेतला पाहिजे. ब्रिटीश लोकांनी लोकशाहीतील एक झळाळणारा धडा युरोपियन व जगातील इतर लोकांनादेखील दिला आहे अशी पुस्ती जोडायला त्या विसरल्या नाहीत. अशाच प्रकारच्या जनमत कौलाची मागणी नेदरलँडस् ह्या देशातून देखील पुढे येऊ लागली आहे. ह्या सर्व प्रकारामुळेच युरोपीयन संघाच्या नेतृत्वाने युनायटेड किंगडमला युरोपीयन संघातून बाहेर पडण्याची प्रक्रिया लवकरात लवकर संपवावी असे म्हटले आहे. एवढेच नव्हे तर युरोपीयन संघ ह्याबाबतीत युनायटेड किंगडमला सर्वोतोपरी मदत करील असे देखील आश्वासन दिले आहे.

---

हसत राहिलात तर संपूर्ण जग आपल्याबरोबर आहे. नाहीतर डोळ्यातल्या अश्रुंना पण डोळ्यांमध्ये जागा नाही मिळत.

बरोबर शंभर वर्षांपूर्वी म्हणजेच १९१६ मध्ये संपूर्ण जगाला ढवळून काढणारे पहिले महायुद्ध सुरु होते. सध्या, म्हणजे शंभर वर्षांनंतर 'ब्रेक्झीट'ची घटनादेखील सर्व जग घुसळून काढत आहे. भारताच्या बाबतीत ह्या घटनेच्या दृष्टीकोनातून विचार केला असता लक्षात येते की, डेव्हीड कॅमरॉन यांच्या पंतप्रधान म्हणून सहा वर्षांच्या कालावधीत ते भारतात तीन वेळा येऊन गेले व त्यांनी युनायटेड किंगडममधील भारतीय जनतेला मजूर पक्षापासून हुजूर पक्षाकडे वळविण्यासाठी मोठे प्रयत्न केले. त्याचप्रमाणे त्यांनी भारत व युनायटेड किंगडम ह्या दोन देशांतील व्यापार वाढावा यासाठी देखील सतत प्रयत्न केलेले निदर्शनास येतात. भारताचे सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व डेव्हीड कॅमरॉन ह्या दोन नेत्यांमध्ये देखील व्यक्तीगत पातळीवर सौहार्दाचे संबंध होते. बोरीस जॉनसन यांचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, ते पूर्वाश्रमीचे पत्रकार आहेत व लंडनचे लोकप्रिय माजी महापौर म्हणून देखील त्यांची ओळख आहे. जॉनसन यांच्या पत्नीचे नाव मरीन व्हीलर असून त्यांचे मूळ 'शीख' धर्मात आहे. जॉनसन यांनी २०१२ साली भारताला भेट दिली होती. त्यांना महापौर असताना भारतीयांनी लंडन शहरात गुंतवणूक केल्यावर आनंद होत असे किंबहुना ते ह्या गोष्टीचा जल्लोष करत असत व युनायटेड किंगडमध्ये शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षण संपल्यानंतर काम करण्यासाठीचा 'व्हिसा' वा परवानगी (Post-Study work Visa) देण्यात यावी यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले आढळतात. त्यामुळे कॅमरॉन यांच्यानंतर जॉनसन हे पंतप्रधान बनले असते तर ती भारताच्या दृष्टीने जमेचीच बाजू ठरणार होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सुरुवातीस डेव्हिड कॅमरॉन यांनी ऑक्टोबर २०१६ पर्यंत काळजीवाहू वा हंगामी पंतप्रधान राहण्याचे ठरविले होते. मात्र, थेरेसा मे यांनी आता पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यामुळे कॅमरॉन यांना पंतप्रधानपदावरुन पायउतार व्हावे लागले आहे. जॉनसन यांनी 'ब्रेक्झीट'चा अर्थ युनायटेड किंगडमने युरोपसोबत आपली पूर्ण नाळ तोडून टाकली असा घेऊ नये अशा आशयाचे मत वक्त केले आहे. ते पुढे जाऊन असे देखील म्हणाले आहेत की, युरोपीयन संघ ही संकल्पना ज्या काळात अस्तित्वात आली तेव्हाच्या काळात ती योग्यच होती व ब्रिटनने युरोपीयन संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला याचा अर्थ युनायटेड किंगडम युरोपचा भाग नाही असा होत नाही.

सध्या तरी भारताने ब्रेक्झीटला युनायटेड किंगडममधील अंतर्गत घटना म्हणून म्हटले आहे, त्याचवेळी भारताला युनायटेड किंगडम व युरोपियन संघ (युरोपियन युनियन) ह्या दोहोंसोबतचे संबंध तेवढेच महत्त्वाचे असल्याचे मत मांडले आहे. ही बाब अतिशय बरोबर आहे, कारण भारताला युरोपियन संघ व ब्रिटनला निर्यात केलेल्या विविध वस्तू व सेवांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. सद्यस्थितीत जरी भारताने भारताच्या दृष्टीने 'सब कुछ ठीक है' अशा आशयाची भूमिका घेतली असली तरी भविष्यात काही महत्त्वाच्या क्षणी तरी युनायटेड किंगडम वा युरोपियन संघ ह्या दोहोंमधून एकाची निवड करावी लागणार आहे हे तितकेच खरे आहे.

२३ जून २०१६ च्या युनायटेड किंगडम मधील जनतेच्या 'ब्रेक्झीट' च्या कौलानंतर युनायटेड किंगडमचे माजी पंतप्रधान डेव्हिड कॅमरॉन खूप नाराज झाले आहेत यात वादच नाही. डेव्हिड कॅमरॉन हे युनायटेड किंगडमने युरोपियन संघातच राहावे या मताचे खंदे समर्थक होते. त्यांनी युनायटेड किंगडमच्या जनतेला युरोपचा संघ आपल्या देशासाठी कशाप्रकारे फायदेशीर आहे हे सांगण्याचा भगिरथ प्रयत्न केला. मात्र, ब्रिटीश जनतेने त्यांच्या मताकडे पूर्णपणे पाठ फिरवलेली दिसते. डेव्हिड कॅमरॉन यांनी अगोदर नमूद केल्याप्रमाणे 'ब्रेक्झीट' च्या निर्णयानंतर लागलीच पंतप्रधान पदावरून पाय उतार

होण्याची घोषणा केली होती. डेव्हिड कॅमरॉन 'ब्रेक्झीट'च्या ह्या निर्णयानंतर बेल्जियमची राजधानी ब्रसेल्स येथे जाऊन युरोपियन संघाच्या नेत्यांना येथून पुढे युनायटेड किंगडमचे युरोपियन युनियन सोबत कशाप्रकारचे संबंध असतील हे सांगणार होते. ब्रिटनला युरोपियन संघातून बाहेर पडण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ह्या संघाच्या करारातील ५० व्या कलमानुसार जास्तीत जास्त दोन वर्षांचा कालावधी मिळणार आहे. मात्र, कॅमरॉन यांनी अगोदरच स्पष्ट केले होते की, युरोपियन संघातून युनायटेड किंगडमने बाहेर पडण्याची प्रक्रिया त्यांच्या पंतप्रधान पदाच्या अधिपत्याखाली होणार नाही. 'ब्रेक्झीट' नंतर लागलीच बोरीस जॉनसन यांचे नाव पंतप्रधान पदासाठी आघाडीवर होते. मात्र, जसजसे दिवस उलटत गेले तसतसे असे निदर्शनास आले की, ब्रिटनमधील सत्ताधारी पक्षातील अनेक नेतेमंडळी पंतप्रधान पदासाठी उत्सुक आहेत. ह्या नेत्यांपैकी काही महत्त्वाची नावे म्हणजे थेरेसा मे, लियाम फॉक्स, मायकल गोव्ह, स्टीफन क्रॅब, अँड्री लीडसम ही होत. मजेची बाब म्हणजे यातील काही नेत्यांनी स्पर्धेतून माघार देखील घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र, १२ जुलै २०१६ पर्यंत युनायटेड किंगडम मधील राजकीय घडामोडीं एवढ्या वेगाने घडल्या की, ह्या तारखेपर्यंत हुजूर पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या व युनायटेड किंगडमच्या गृहमंत्री श्रीमती थेरेसा मे (Theresa May) यांचे नाव पंतप्रधान पदासाठी जवळ जवळ निश्चित झाले होते व त्यांचा रितसर शपथविधी १३ जुलै २०१६ रोजी होण्याचे ठरले होते. त्यामुळे युनायटेड किंगडमचा पुढील पंतप्रधान कोण व डेव्हीड कॅमरॉन यांचा वारसदार कोण ह्या प्रश्नांचे उत्तर तूर्तास तरी मिळाले आहे. राजकारणात कोणत्याही घडामोडी स्थिर नसतात. त्यामुळे भविष्यात काय होईल हे सांगता येत नाही. थेरेसा मे यांना युनायटेड किंगडममधील राजकीय स्थितीचे व 'ब्रेक्झीट'चे शिवधनुष्य लिलया पेलावे लागणार आहे असे दिसते. काही विश्लेषकांनी 'ब्रेक्झीट'च्या घटनेची तुलना १९९० साली सध्याची जर्मनीची राजधानी असलेल्या बर्लिनची भिंत कोसळण्याच्या ऐतिहासिक घटनेशी केली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरीका व सोव्हिएट संघ ह्या दोन देशांमधील स्पर्धेमुळे व शीतयुद्धामुळे जर्मनी ह्या देशाचे पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अशा दोन देशांमध्ये विभाजन झाले होते. पूर्व जर्मनीची राजधानी बर्लिन हेच शहर राहिले. बर्लिन हे शहर विभाजनापूर्वी अखंड जर्मनीच्या राजधारीचे शहर होते. बॉन हे शहर पश्चिम जर्मनीची राजधानी बनले. पूर्व जर्मनीत साम्यवादी राजवट प्रस्थापित झाली व ह्या देशाचे सोव्हिएट संघाशी घनिष्ट संबंध निर्माण झाले. पश्चिम जर्मनीत लोकशाही सरकारची स्थापना झाली व पश्चिम जर्मनी प्रामुख्याने इंग्लंड, फ्रान्स व अमेरीका यांच्या बाजूने उभा ठाकलेला दिसला. पूर्व जर्मनीची राजधानी बर्लिन ह्या शहरातील जनतेमध्ये देखील बरीच फूट पडलेली होती. पश्चिम बर्लिनमधील जनतेची पश्चिम जर्मनीला सहानुभूती होती. तर पूर्व बर्लिन हा साम्यवादांचा बालेकिल्ला होता असे म्हटले जाते. ह्या विचित्र परिस्थितीमुळेच जर्मनी ह्या देशाप्रमाणेच बर्लिन ह्या शहराचे देखील पूर्व व पश्चिम बर्लिन अशा दोन भागांमध्ये विभाजन करण्यात आले होते व ह्या दोन शहरांना विभागणारी चक्क एक भिंत बांधण्यात आली होती. ह्याच भिंतीला बर्लिनची भिंत म्हणून ओळखले जाते. १९९० सालापर्यंत जर्मन जनता जर्मनी ह्या देशाच्या कृत्रिमरित्या केलेल्या विभाजनाला वैतागली होती व ह्या विभाजनाचे जिवंत प्रतीक म्हणजे बर्लिनची भिंत होती. जर्मन जनतेने १९९० साली स्वतः पुढाकार घेऊन ही भिंत अक्षरशः तोडली व तिला इतिहासजमा केले व ही ऐतिहासिक घटना म्हणजेच जर्मनीच्या एकीकरणाची नांदी ठरली. बर्लिनची भिंत कोसळल्यानंतर पश्चिम जर्मनी व पूर्व जर्मनी एकत्र येण्याची सुरुवात झाली व पुन्हा एकदा अखंड जर्मनी अस्तित्वात आला. जर्मन जनता बर्लिनची भिंत पाडत असतानाची ही घटना

---

बीबीसी (BBC - British Broadcasting Corporation) सारख्या ब्रिटीश आंतरराष्ट्रीय बातम्यांच्या वाहिनीने थेट प्रसारीत केली होती व जगभरातील कोट्यावधी लोकांनी हा ऐतिहासिक प्रसंग घरात बसून दूरदर्शनवर पाहिला होता. 'ब्रेक्झीट' ची तुलना अशा ह्या ऐतिहासिक घटनेबरोबर करण्यात आली आहे व ही तुलना बरोबरच आहे असे म्हणावे लागते. याचे कारण म्हणजे ह्या घटनेमुळे संपूर्ण जगावर येणाऱ्या काळात वेगवेगळे परिणाम होणार आहेत. काही अभ्यासकांच्या मते 'ब्रेक्झीट' मुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

'ब्रेक्झीट' संबंधी विविध नेते मंडळींनी व तज्ज्ञांनी वेगवेगळी टिप्पणी केलेली आढळते. मुंबईतून प्रसिद्ध होणाऱ्या इकॉनॉमिक टाइम्स ह्या वृत्तपत्राच्या २५ जून २०१६ च्या अंकात स्वामिनाथन एस्. अंकलेसरय्या अय्यर ह्या ज्येष्ठ भारतीय तज्ज्ञाने ब्रेक्झीटच्या संभाव्य परिणामावर भाष्य करताना २१ व्या शतकात पुन्हा एकदा अतिरेकी राष्ट्रवाद, वर्णद्वेष इत्यादी अपप्रवृत्ती डोके वर काढण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे. ह्याच अंकात टी. के. अरुण ह्यांनी आपल्या लेखात 'ब्रेक्झीट' ही लंडन ह्या शहरास जगातील एक प्रमुख वित्तीय (आर्थिक) केंद्र म्हणून वाईट बातमी असल्याचे व भारतीय कंपन्यांसाठी देखील समस्या निर्माण करणारी घटना असल्याचे नमूद केले आहे. युनायटेड किंगडममधील युके इंडिपेन्डन्स (UK Independence) चे नेते नायजेल फॅरेज (Nigel Farage) यांच्या मते २३ जून २०१६ ह्या दिवसाची नोंद युनायटेड किंगडमचा स्वातंत्र्य दिन म्हणून होईल. लंडनचे माजी महापौर बोरीस जॉनसन यांच्यामते आता युनायटेड किंगडमला स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची सुवर्णसंधी असून युनायटेड किंगडम आपले करविषयक कायदे स्वतःच्या गरजांनुसार बनविण्यास स्वतंत्र आहे. अमेरीकेतील २०१६ साली होऊ घातलेल्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीतील रिपब्लिकन पक्षाचे वादग्रस्त उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिटीश जनतेच्या 'ब्रेक्झीट'च्या निर्णयाचे स्वागत केले आहे. युरोपियन संघाचे अध्यक्ष डोनाल्ड टस्क (Donald Tusk) यांनी म्हटले आहे की, युरोपियन संघाचे सध्या असलेले २७ सदस्य देश आपले ऐक्य म्हणजेच युरोपियन युनियन वा संघाचे ऐक्य टिकवण्यास कटीबद्ध आहेत. जगभरात वाचन संस्कृतीचा व प्रामुख्याने लहान मुलांमध्ये वाचनाची रुची निर्माण करण्यात आपल्या 'जादूई' लिखाणाच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या 'हॅरी पॉटरकार' जे. के. रोलींग (J. K. Rowling) यांची प्रतिक्रिया देखील बोलकी आहे. जे. के. रोलिंग यांची प्रतिक्रिया २५ जून २०१६ च्या इकॉनॉमिक टाइम्स ह्या इंग्रजी वृत्तपत्रात छापून आली आहे. ब्रेक्झीट, युरोप, युनायटेड किंगडम व युरोपचा संघ यांचे विविध पैलू उलगडून दाखविण्यासाठी एक लेख फारच अपूरा पडेल म्हणूनच जे. के. रोलिंग यांचे इंग्रजीतील पुढील वक्तव्य वाचून वाचकांनी काय तो अर्थ लावावा–

"Goodbye, OK. I don't think I've ever wanted magic more. Scotland will seek independence now. Cameron's legacy will be breaking up two unions. Neither needed to happen."

**संदर्भ :**


१) मास्टर रिंग मॉडर्न वर्ल्ड हिस्ट्री : नॉर्मन लो

२) वर्ल्डबुक एनसायक्लोपेडिया

३) इकॉनॉमिक टाइम्स (वृत्तपत्र)– २५ जून २०१६


**टीप:** ह्या लेखात दिनांक १२ जुलै २०१६ पर्यंत घडलेल्या घटना नमूद केलेल्या आहे.


**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात ७४२ विद्यार्थी शिकत होते. वार्षिक परीक्षेचा निकाल १००% लागला असून, शासनाच्या आर. टी. ई. च्या नियमानुसार शाळा समृद्धीची दहा मानके पूर्ण करून 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे. तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत शाळेला 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. वार्षिक निकाल खालीलप्रमाणे -

| | | एकूण विद्यार्थी | | 'अ' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | | 'ब' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | | क' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | | 'ड' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | पट | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली |
| १ ली | १६८ | ८४ | ८४ | ४७ | ६१ | ३० | १५ | ७ | ८ | - | - |
| २ री | १४५ | ८२ | ६३ | ४९ | ४८ | ३३ | १५ | - | - | - | - |
| ३ री | १७६ | ८२ | ९४ | ५५ | ७५ | २५ | १८ | २ | १ | - | - |
| ४ थी | २५३ | १४१ | ११२ | ९८ | ८७ | ४० | २२ | ३ | ३ | - | - |
| एकूण | ७४२ | ३८९ | ३५३ | २४९ | २७१ | १२८ | ७० | १२ | १२ | - | - |

### प्रवेशोत्सव व पाठ्यपुस्तक वितरण

बुधवार दि. १५ जून २०१६ रोजी इ. १ ली ते ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांचा स्वागतोत्सव साजरा करण्यात आला. नवागतांच्या स्वागतासाठी वर्ग व फलक सजावट करण्यात आली. इ. १ लीच्या नवोदित विद्यार्थ्यांची शाळेच्या प्रांगणात प्रभात फेरी काढण्यात आली व गोळ्या वाटून टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्या दिवशी शासनाच्या सर्व शिक्षा अभियान अंतर्गत इ.१ली ते ४थीच्या सर्व विद्यार्थ्यांना आलेल्या पाठ्यपुस्तकांचे वितरण शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे बाई तसेच व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष श्री. आनंद मालुसरे व व्यवस्थापन समिती शिक्षणतज्ज्ञ श्री. बसवराज बन्ने यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे व अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

### आंतरराष्ट्रीय योगदिन

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या आदेशानुसार तसेच २१ जून हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने 'आंतरराष्ट्रीय योगदिन' म्हणून घोषित केल्याप्रमाणे या दिनाचे औचित्य साधून शाळेच्या सभागृहात हा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेचा सर्व कर्मचारी वर्ग, विद्यार्थी-विद्यार्थीनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. योग प्रशिक्षण घेतलेल्या 'सौ. धर्माधिकारी' बाईंनी प्रार्थना ध्यानस्थिती, योगमुद्रा, सूर्यनमस्कार, प्राणायाम इ. प्रात्याक्षिके करून दाखवून विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. ज्येष्ठ शिक्षिका सौ. घोरपडे बाई यांनी योग शिक्षणाची माहिती व फायदा समजावून सांगितला.

---

कुठे बोलतांना आपल्या शब्दांची उंची वाढवा, आवाजाची उंची नको. पडणाऱ्या पावसामुळे शेती पिकते; विजेच्या कडकडाटामुळे नव्हे.- पु. ल. देशपांडे

सौ. गांगल व मोहिते बाईंनी विद्यार्थ्यांकडून योगगीत म्हणून घेतले व शेवटी ॐ काराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**एम्.टी.एस. परीक्षा – इ.३ री व ४ थी**



सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात ३० जानेवारी २०१६ रोजी घेण्यात एम्.टी.एस्. या परीक्षेस बसलेल्या इ.३रीच्या विद्यार्थ्यांचा निकाल १००% लागला असून इ.३ रीच्या सर्व शिक्षिकांनी त्यांना मार्गदर्शन केले. यात कु. यश गणेश जगदाळे हा ठाणे केंद्रात पहिला आला.

तसेच इ. ४थी चे ५७ पैकी ५६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९८.२५% एवढा निकाल लागला. यापैकी कु. आदित्य निलेश साजेकर हा विद्यार्थी ठाणे केंद्रातून चौथा तर कु. साहिल अशोक खोत हा पाचवा आला. सर्व यशस्वी विद्याार्थ्यांचे शाळेकडून हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

**पालक सभा**


शनिवार दि. २५ जून २०१६ रोजी इ. १ली ते ४थीतील विद्यार्थ्यांच्या पालकांची शिक्षक-पालक सभा घेण्यात आली. या सभेत वर्षातील अभ्यासक्रमाचे नियोजन व शालेय नियमांची माहिती पालकांना देण्यात आली. तसेच मतदान पद्धतीने पालक-शिक्षक प्रतिनिधी व माता पालक प्रतिनिधी निवडण्यात येऊन या सदस्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०१६च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल :**

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | - १४८ |
| प्रीक्षेला बसलेले विद्यार्थी | - १४८ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | - १४८ |
| टक्केवारी | - १००% |
| विशेष प्राविण्य | - ११५ |

प्रथम श्रेणी-३२ द्वितीय श्रेणी-०१ तृतीय श्रेणी-००




| टक्के | सर्वोत्तम पाच विषयातील विद्यार्थी संख्या | % |
|---|---|---|
| ९० आणि अधिक | ४७ | ३२ |
| ८०-८९ | ५७ | ३८ |
| ७०-७९ | २८ | १९ |
| ६०-६९ | १५ | १० |
| ५०-५९ | १ | १ |
| ४९ च्या खाली | ० | ० |

**पहिले दहा क्रमांक :**

| क्र . | विद्यार्थ्यांची नावे | % |
|---|---|---|
| १ | प्रज्ञा घारपुरे | ९६.०० |
| १ | शांभवी जोशी | ९६.०० |
| २ | श्रेयस बाळ | ९५.८० |
| ३ | रिद्धी खोले | ९५.६० |
| ४ | आदित्य दातार | ९५.२० |
| ४ | रुचिरा जोशी | ९५.२० |

| | | |
|---|---|---|
| ५ | वरदा अवचट | ९५.०० |
| ६ | शिवानी निफाडकर | ९४.८० |
| ६ | धीर सावला | ९४.८० |
| ७ | तन्मय अंबिके | ९४.६० |
| ७ | मोहित मुसळे | ९४.६० |
| ७ | देवयानी व्यवहारकर | ९४.६० |
| ८ | सानिका गोरे | ९४.४० |
| ८ | श्रीदिप क्षिरसागर | ९४.४० |
| ८ | श्रृष्टी पोळेकर | ९४.४० |
| ८ | हर्षील बउवा | ९४.४० |
| ९ | अर्थव जोशी | ९४.०० |
| १० | अनुष्का चौबळ | ९३.८० |

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक**

| **विषय** | **विद्यार्थ्यांचीनावे** | **गुण** |
|---|---|---|
| इंग्रजी | रिद्धी खोले | ९० |
| मराठी | शिवानी निफाडकर | ९१ |
| | वरदा अवचट | ९१ |
| संस्कृत | प्रज्ञा घारपुरे | ९९ |
| | सानिका गोरे | ९९ |
| | ओंकार वरुडकर | ९९ |
| | वरदा अवचट | ९९ |
| हिन्दी | हर्षील बउवा | ९२ |
| | ईशीता सुळे | ९२ |
| गणित | शिवानी निफाडकर | ९९ |
| विज्ञान | श्रेयस बाळ | ९८ |
| | धीर सावला | ९८ |
| | हर्षील बउवा | ९८ |
| | रुचिरा जोशी | ९८ |
| समाजशास्त्र | प्रज्ञा घारपुरे | ९८ |
| | नेहा नवरे | ९८ |
| | श्रेयस बाळ | ९८ |
| | हर्षील बउवा | ९८ |

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**केंद्रिय तपासणी कार्यक्रम**

विद्यापीठाचे एल. एल. बी. एप्रिल, २०१६च्या पेपर तपासणीचे काम दि.२०.६.२०१६ रोजी पूर्ण झाले असून २१.६.२०१६ रोजी विद्यापीठाकडे सुपुर्द करण्यात आले.

**बी. सी. आय. वार्षिक अहवाल**

प्रवेश प्रक्रिया, शुल्क, कर्मचारी व प्रात्यक्षिक परिक्षा इ. संबंधित अहवाल महाविद्यालया तर्फे दिनांक २०.६.२०१६ रोजी बी. सी. आय. ला देण्यात आला.

**महाराष्ट्र विधी CET**

महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक १८ व १९ जून रोजी महाराष्ट्रातील एल. एल. बी. (३ वर्षे) व (५ वर्षे) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेवर आक्षेप घेणारी PIL दि. ५ जून २०१६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाकडून अमान्य करण्यात आली.

**भावपूर्ण श्रद्धांजली**



आमच्या विधी महाविद्यालयाचे चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. पन्नालाल सुकलाल त्रिभुवन यांचे दिनांक १५/०६/२०१६ रोजी वयाच्या ५० व्या वर्षी आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व ३ मुले आहेत. त्यांचे आकस्मित निधन मनाला चटका लावून जाणारे आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो हीच प्रार्थना व त्यांच्या कुटुंबाला या दुःखातून सावरण्यासाठी मनोबल देवो. विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांकडून विनम्र श्रद्धांजली.

**निकाल व प्रवेश प्रक्रिया**

प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष विधीची प्रवेश प्रक्रिया निकाल न लागल्याने अद्याप सुरु होऊ शकली नाही.

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

निर्णयामध्ये आपली ही असहाय्यता खालील शब्दांत व्यक्त केली आहे.

> "We are of the convinced opinion that when there is no disqualification for a person against whom charges have been framed in respect of heinous or serious offences or offences relating to corruption to contest the election by interpretative process, it is difficult to read the prohibition into Article 75(I) to the powers of the Prime Minister or the Chief Minister in such a manner."

प्रत्येक नागरीकांनी हे निकालपत्र (Judgement) वाचणे गरजेचे आहे. आपली असहाय्यता त्यांनी दर्शवली असली तरी, त्यांच्या निर्वाचित सरकारकडून असलेल्या अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

> "A democratic republic policy hopes and aspires to be governed by a Government which is run by the elected representatives who do not have any involvement in serious criminal offences or offences relating to corruption, casteism, societal problems, affecting the soveriegnity of the nation and many other offences corruption has the potentiality to destroy many progressive aspect and it has acted as the formidable enemy of the nation."

सध्या नाही तर खून, बलात्कार, अपहरण अशा गुन्हेगारीची पार्श्वभूमी असलेल्या धटींगणांना 'राष्ट्रीय' आणि 'प्रांतिय' राजकीय पक्षांनी दिलेल्या उमेदवारीची आकडेवारी छाती दडपून टाकणारी आहे. लोकांनीही अशा उमेदवारांना निवडून दिलेल्यांची संख्या आणखीच दुःखकारक आहे. सध्याच्या केंद्रिय मंत्रिमंडळात ७८ मंत्री आहेत. यातल्या ३१% (२४) मंत्र्यांना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. १८% (१४) मंत्र्यांवर 'गंभीर' गुन्हेगारी आरोप आहेत.

उठता बसता 'गरिबी' आणि 'तळागाळा'तल्या लोकांच्या उद्धाराचा 'मंत्र' जपणाऱ्या या मंत्रिमंडळातील ९२% (७२) मंत्री 'कोट्याधीश' आहेत. या मंत्रिमंडळातील १८% (१४) मंत्री, फक्त १२ वीपर्यंत शिकलेले आहेत. विद्यावाचस्पती (Doctorate) दर्जा प्राप्त फक्त ४ मत्र्यांना आहे. अगदी गल्ली बोळातील राजकारण्यांमधील गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि त्यांचे कोट्याधीश असणे या नाते संबंधाची उकल करायला आइनस्टाईनची गरज नाही.

मुंबई, ठाण्यामध्ये एका महिला पोलिसाशी हातघाई करणाऱ्या राजकीय पुढाऱ्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचे बोर्ड झळकतात, किंवा एखाद्या राजकिय पक्षाची स्त्री प्रतिनिधी कुंटणखाना चालवते हे कशाचे द्योतक आहे? लोकप्रतिनिधी हे शेवटी लोकांचेच प्रतिबिंब असते. अशा लोकांनाच आपण निवडून देणार असू, तर 'दुटप्पी'पणा आणि 'दांभिक'पणाचे एवढे चांगले उदाहरण जगात दुसरे सापडणार नाही.

सिनेमा असो, जाहिराती असोत किंवा इतर प्रसिद्धी माध्यमं असोत, 'गुन्हेगारी' आणि 'लिंग' पिसाटपणाला त्यामधून मिळणारे प्रोत्साहन समाजाला दुसरे कुठले 'मार्गदर्शन' करणार? दहीहंडी, गणपती उत्सव किंवा नवरात्रीच्या सणांचे झालेले गुन्हेगारीकरण, राजकीयकरण आणि व्यापारीकरण हे कशाचे द्योतक आहे? आगमनापासून ते विसर्जनापर्यंतच्या मिरवणुकीतील धिंगाणा, रस्ते आडवून घातलेले मांडव, बेंजो, ढोलताशांनी केलेले ध्वनीप्रदूषण, आणि या सगळ्याचे अत्यंत काव्यात्मक पद्धतीने 'तरुणाई थिरकली' सारखी माध्यमांनी केलेली वर्णने ही या राजकीय धटींगणशाहीला प्रोत्साहनच देत नाहीत कां? सणांच्या सादरीकरण करण्याच्या संदर्भात न्यायालयानी दिलेल्या आदेशांचे पालन करतानाही राजकीय नेतृत्वानी दाखवलेली टाळाटाळ 'चिंता' वाढवणारी आहे. उघडपणे किंवा छुपेपणे कायद्याचा अवमान, आणि धटींगणशाहीला हे प्रोत्साहनच नाही का? अप्रियता तर दूर राहिली, पण बाळबोध 'प्रबोधना'चा मार्गही या संदर्भात राजकीय नेतृत्व स्विकारायला तयार नाही!!

चित्रपट आणि दूरदर्शनवरील मालिकांबद्दल तर काय लिहावे?

---

राजकारणातील गुन्हेगारीच्या संदर्भात भारतीय घटना जेवढी 'कमकुवत' आणि 'असहाय्य' आहे तिच गोष्ट 'व्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'उच्चार स्वातंत्र्याच्या' बाबतीत आहे. राजकपूर, देवानंदच्या काळामध्ये झाडाच्या पुढे मागे लपंडाव खेळून तरुणपिढी 'प्रेम' व्यक्त करीत होती. गीतरचना आणि संगीत हे यांचे 'आत्मा' होते. तरीही खानदान, किंवा आईवडील हे यामध्ये खलनायक असायचेच. आता या फिल्मी प्रेमानी वयाच्या बाबतीत नवीन दिशा घेतली आहे. 'प्रेम' आता आणखीन 'तरुण' व्हायला लागले आहे. हातधुण्यापासून, पाण्यापर्यंतच्या जाहिरातीमध्ये आजकाल मुलांना प्राधान्य दिले जाते. मराठी सिनेमांनी याबाबतीत आता क्रांतीची नवी 'शिखरं' गाठली आहेत. सिनेमातील प्रभावीपणे दाखवल्या गेलेल्या शालेय मुलांतील प्रेमाच्या 'अंकूरा'चा आता वृक्ष होऊन त्याला कोटीकोटीची फळ लागली आहेत. कालांतराने मराठी सिनेमाला शालेय वयही मोठे वाटायला लागेल, आणि आणखीन एक 'प्रौढ' क्रांती होईल. प्रसुतीगृहातील पाळण्यातील मुलंमुली आपल्या प्रेमाचा पाझर, हातपाय झाडून आणि शि-शू करून, या क्रांतीकारक सिनेमामधून व्यक्त करतांना बघायला मिळाली तर त्यात नवल वाटायला नको. प्रश्न आहे तो फक्त, ही मुल माध्यमामधून प्रसिद्धी करता आपल्या मुलाखती कशा देतील याचा!!

हा दांभिकपणा इथेच थांबत नाही. 'दारु', 'सिगरेट', 'गुटका' यांचे दुष्परिणाम विज्ञानाने 'सिद्ध' केले आहेत. भारतामध्ये सगळ्या दारुच्या कंपन्यांनी सोड्याच्या बाटल्या काढल्या आहेत. सोडा, हा 'रंगत', 'धुंद', 'मस्त' असतो हा शोध म्हणजे भारतानी जगाला दिलेली एक मोठी भेट आहे. दारुची जाहिरात करता येत नाही म्हणून जाहिरात सोड्याची!! वास्तविक अशा छुप्या जाहिरातींवर कायद्याने बंदी आहे.

सिगरेट कंपन्यांनाही उघडपणे जाहिरात करता येत नाही. प्रसिद्ध नट स्वप्नील जोशी, आणि नटी सई ताम्हणकर हे तरुणांकरता असलेल्या एका सिनेमामध्ये मानसिक 'ताण' कमी करण्याकरता 'धुम्रपान' करतात. या सिनेमातील एका गाण्यात तर चक्क, तरुणाई म्हणजे धुम्रपान आवश्यकच, हे खूबीदारपणे दाखवले आहे. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात त्यांनी कसे वागावे हा त्यांचा प्रश्न आहे, पण सिनेमा सारख्या परिणामकारक माध्यमातून धुम्रपानास प्रोत्साहन देणे हा सामाजिक गुन्हा आहे. धुम्रपान आणि गुटक्यामुळे कर्करोग झालेल्या रुग्णांची या दोघांनीही एकदा तरी टाटा रुग्णालयात जाऊन भेट घ्यावी. या रुग्णांबरोबरच त्यांच्या कुटुंबाचीही झालेली वाताहात त्यांना तिथे बघायला मिळेल. 'पैसा', 'प्रसिद्धी' आणि 'धंद्या'करता 'सामाजिक' जाणिवा आणि साधनशुचितेला बासनात बांधून ठेवलेल्या अशा 'बधिर' महाभागांना यामुळे 'उपरती' होईल याची सुतराम शक्यता नाही. माध्यमांमध्ये हेच 'नट' आणि 'नट्या' जेव्हा सामाजिक परीवर्तनाच्या गप्पा मारतात, तेव्हा मात्र ते 'नाटक' बघून फक्त 'क्लेश' होतात.

'भारतरत्न' मिळालेल्या व्यक्तींनी तरी आपले मित्र कोण असावेत, आपण कोणाची शिफारस करावी, याचे काहीतरी सामाजिक भान ठेवणे गरजेचे आहे, पण क्रिकेटपटूंना बहुतेक भारतीय संविधानानी त्यामध्ये सुटका दिली असावी.

बलात्काराकरता सध्या कायद्यामध्ये बदल करून देहदंडाची शिक्षाही मिळू शकते. पण गेल्या दोन वर्षांमध्ये बलात्कारांचे वाढते प्रमाण, त्यातले क्रौर्य, आणि बलात्कारीत स्त्रीचे कमी होणारे वय बघून, फक्त कायद्यानी या गोष्टी बदलतील असे दिसत नाही. 'पैसा' आणि 'प्रसिद्धी' करता 'सिनेमा', 'माध्यम' आणि 'जाहिरातीं'मधून वाढत जाणाऱ्या गुन्हेगारी आणि लिंगपिसाटपणाचे समर्थन जोपर्यंत हा समाज थांबवायला तयार नाही, तोपर्यंत 'समाज' संवेदना जास्तीत-जास्त बधिरच होत जातील. 'सैराटी'करणाकडून 'सुसंस्कृत'पणाकडचा हा प्रवास कठीण आहे पण अशक्य नक्कीच नाही, आणि मग पावसाळ्यातही आठवण होते ती सुरेश भटांच्या कवितेची -

''उषःकाल होता होता काळ रात्र झाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...''

**- डॉ. विजय बेडेकर**

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.